भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

**संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!**



कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

**वर्ष ११ वे** | **जानेवारी – मार्च २०१६** | **अंक ४ था**

**अध्यक्षः श्री. आनंद पराडकर**
**मो.नं ९३२६८२६८८४**

**सचिवः श्री. गोपाळ भाटवडेकर**
**मो.नं ९८५०९७९७०६**

**कोषाध्यक्षः श्री. चंद्रशेखर जोशी**
**मो.नं ९४४९०५१६५३**

संपादक मंडळ

**मुख्य संपादक :**

**श्री. गणेश गुर्जर**

पुणे, ९८९०९९०११३

**श्री. श्रीगजानन गुर्जर**

पुणे, ९९७०१७४८१८

**शहर प्रतिनिधी :**

श्री. दिलीप धोपेश्वरकर, मुंबई, ९८२०५२१०९८
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९०५१६५३
श्री. संदीप पुराणिक, ९८५००९४३००
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर, ९८६०२५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२२१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ०२१६२–२३३६४३
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५७९४००
श्री मिलींद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९०३७३४१
श्री. हेमंत पुराणिक, पुणे, ९९२३८१०१९४
श्री. नरेंद्र पानवलकर, बडोदा, ९२२७१३५७९४
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९९५८९२
श्री. चंद्रशेखर आठल्ये, ठाणे, ९८६९६७४९५८
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१४८७७५
श्री. विनायक उमर्ये,आजगांव,जि. सिंधुदूर्ग, ९४२३८८०१३८
श्री. गजानन साईनेकर, गोवा, ९९२३७९९६९७

**ऑफिस संपर्क : ८१४९९०७७८९**
email : bkbmsindia@gmail.com

**भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे संपर्क हे त्रैमासिक मालक, भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (ट्रस्ट) यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक गोपाळ भाटवडेकर यांनी एकविरा प्रकाशन, कर्वेनगर, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, अनिश प्रसाद अपार्टमेंट, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक – गणेश गुर्जर**

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदारांस या द्वारे आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी रू. १००/– (रूपये शंभर मात्र) आपल्या शहर प्रतिनिधींकडे जमा करावी. शहर प्रतिनिधींकडे प्रत्येक सभासदाची वर्गणी कोणत्या महिन्यापासून येणे आहे, त्याच्या याद्या पाठवल्या आहेत. त्यानुसार शहर प्रतिनिधींशी संपर्क करून वर्गणी जमा करावी. शहर प्रतिनिधींनी जमा झालेली वर्गणी आपल्या नजिकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाच्या खाते क्रमांक ०५०५१०११०००९४१० वर लक्ष्मीरोड, पुणे शाखेमध्ये जमा करून यादी आणि जमा पावती पुणे कार्यालयाकडे पाठवावी. बँक ऑफ इंडिया, IFSC Code BKID0000505 कोणत्याही अंकापासून वर्गणीदार होता येते. किरकोळ अंक विक्री नाही.

**संपादक**
**– गणेश गुर्जर**

## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/– | १५००/– |
| अर्धा | ८००/– | ३०००/– |
| पूर्ण | १६००/– | ६०००/– |
| शुभेच्छा | २५०/– | १०००/– |
| पुर्ण पान रंगीत | २५००/– | १००००/– |

**नियतकालिकाचे नाव** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे'संपर्क'
**पत्ता** : भारतीय कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ,
**द्वारा :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे – ४११ ०३०
**संपादक** : श्री. गणेश गुर्जर
**मुद्रक** : एकविरा प्रकाशन आणि प्रसिद्धी सेवा,
स.नं.१/२७ व २९, माऊली सोसायटी, अपर्णा हाऊस समोर,
विठ्ठल मंदिरामागे, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२.

संपर्क

# अनुक्रम


बकुळफुले – नवी पिढी ........................................................ ४

निष्णात कायदेपंडित श्रीहरी अणे ............................................... ५

संस्थावृत्त : पुणे ................................................................... ७

काळ आला होता; पण.......................................................... ८

जीवन सौंदर्याचा साक्षात्कार घडविणारे राजकवी तांबे ....................... ९

'मन्नाडे' .......................................................................... १२

शंकरशेठ शिष्यवृत्तीचे पहिले मानकरी : यशवंत वासुदेव आठल्ये ........... १४

बाळशास्त्री जांभेकर .............................................................. १५

बेळगांव संघाची पावसाळी सहल ................................................ २१

आठवणीतील गाणी ............................................................. २२

नर्मदा परिक्रमा व नर्मदा माहात्म्य ............................................... २३

व्यक्तिपरिचय : राष्ट्रशाहीर म. ना. नानिवडेकर .............................. २५

प्राचीनतम सनातन धर्म .......................................................... २६

स्वा.सै. वसंतराव बोंद्रे- गुर्जर .................................................. २७

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचा रौप्य महोत्सव कार्यक्रम ........................... २८

सर्वोच्च आनंदाचा क्षण! ......................................................... २९

जेव्हा कार्यशाळेची आनंदशाळा होते............................................ ३०

खाद्यविविधता ................................................................... ३२


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

# संपादकीय


सप्रेम नमस्कार

वर्ष २०१५ सरले. अनेक चांगल्या-वाईट घटना घडल्या. काही आपल्या ज्ञातीशी निगडित निर्णयही आपण घेऊन एक उत्तम कार्यक्रम करावा यासाठी कृती समिती नेमली आणि तिचे कार्य सुरू झाले. विविध समित्यांचे गठण केले आणि या कृती समितीच्या बैठका होत असून दि. १० एप्रिल २०१६ रोजी पुणे येथे हा कार्यक्रम करण्याचे निश्चित झाले आहे. या कार्यक्रमात आपल्या काही ज्ञातीबांधवांचा ज्यांनी त्यांच्या क्षेत्रात उत्तुंग कार्य करून स्वतःचे आणि आपल्या ज्ञातीचे नाव एका उंचीवर नेले आहे अशांचा सत्कार, कऱ्हाडे ज्ञातीची समग्र माहिती असलेली स्मरणिका, विविध व्यक्तींची माहिती, फोटो, संघाची माहिती प्रकाशित करणार आहोत. करमणुकीचा कार्यक्रम, नाश्ता, भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. आपण आपल्या संघाच्या कार्यालयात संपर्क करून आपले नाव द्यावे आणि कार्यक्रम यशस्वी करावा. यासाठी अंकामध्ये विविध समित्यांची व सभासदांची नावे व भ्रमणध्वनी क्रमांक दिले आहेत. जाहिरातींचे दरपत्रक छापले आहे. तरी या सर्वांचे आकलन करून आपण या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

बंगळुरू येथे दि. २ व ३ जानेवारी २०१६ रोजी कऱ्हाडे ब्राह्मण समाज यांनी महासंघाची सभा आयोजित केली आहे आणि नवचंडी यागाचेही आयोजन केले आहे. त्याचप्रमाणे कऱ्हाडे ब्राह्मण बिझनेस फोरमच्या पुणे गटाने दि. १७ जाने. २०१६ रोजी पुणे येथे प्रथम वर्धापन दिनाच्या निमित्ताने एक कार्यक्रम ठेवला आहे. ब्राह्मण बिझनेस कॉन्फरन्स पुणे द्वारा दि. १३ व १४ फेब्रुवारी रोजी हा कार्यक्रम होणार आहे. अशा पद्धतीने आपल्या समाजामध्ये ज्ञातीबाबतची जागृती व आपल्या विकासासाठी पुढे पुढे जाण्याचे मार्ग उपलब्ध होत आहेत. आणि यामुळे आपल्या ज्ञातीची प्रगती निश्चितच होईल, अशी आशा आहे.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्ताने आपल्या ज्ञातीमधील संरक्षण क्षेत्रातील उच्चपदस्थ व्यक्तींचा परिचय व्हावा म्हणून त्यांचे फोटो घेतले आहेत.

प्रजासत्ताक दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!





‘बकुळफुले’

डॉ. श्रीकृष्ण जोशी
रत्नागिरी

या नव्या पिढीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन स्वागतार्ह असायला हवा, असं मला मनापासून वाटतं. त्यांचं बोलणं, त्यांचं वागणं, जुन्या गोष्टींकडे नव्या संदर्भातून पाहणं आणि दुसऱ्याला पटो न पटो पण स्वतःची मतं ठामपणे माडणं, हे सर्व स्वागतार्ह आहे.

# नवी पिढी

मोर आनंदानं केव्हा नाचतो? या प्रश्नाचं उत्तर विचारल्यानंतर, या नव्या पिढीला आकाशात ढग जमा झाल्यानंतर मोर आनंदानं थुईथुई नाचतो, हे माहीत नसावं. म्हणून पुन्हा विचालं, आकाशात ढग दाटून येतात तेव्हा पृथ्वीवरच्या कोणकोणत्या पक्षांना, प्राण्यांना आनंद होतो? तरीही उत्तर मिळालं नाही. आता आश्चर्य करण्याची वेळ माझ्यावर आली होती. तेवढ्यात एका विद्यार्थिनीने हात वर केला. मला बरं वाटलं. चला, एक तरी विद्यार्थी उत्तर देणार. मी खूश झालो. तेवढ्यात ती विद्यार्थिनी म्हणाली, हल्ली मोर आनंदानं नाचतच नाही, कारण आकाशातल्या ढगांमध्ये शुद्ध बाष्प नसतंच मुळी. उलट प्रदूषित वातावरणामुळं बाष्पयुक्त ढग कोणते आणि प्रदूषित ढग कोणते, हे ओळखू येत नाही. मोर आनंदानं नाचतीलच कसे?

त्या विद्यार्थिनीचं हे स्पष्टीकरण सर्वांनाच अंतर्मुख करायला लावणारं होतं.

प्रदूषणावर आज इतक लिहिलं, बोललं जातंय, पण उगवती नवी पिढी त्याकडं किती व्यवहार्य दृष्टीनं पाहते आहे, याच समाधान निश्चितपणे मला मिळालं होतं. या नव्या पिढीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन स्वागतार्ह असायला हवा, असं मला मनापासून वाटतं. त्यांचं बोलणं, त्यांचं वागणं, जुन्या गोष्टींकडे नव्या संदर्भातून पाहणं आणि दुसऱ्याला पटो न पटो पण स्वतःची मतं ठामपणे माडणं, हे सर्व स्वागतार्ह आहे. अनेक वेळेला नव्या पिढीच्या एकूणच वर्तनाकडे पाहण्याची आपली दृष्टी चुकीची असते आणि त्याहीपेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर अन्याय करणारी असते. किंबहुना आपली पारंपरिक मतं उराशी बाळगून, त्यांना कोंबण्याचा आपण प्रयत्न करतो. कधी कधी त्यांची मतं उडवून लावतो, तर कधी त्यांना वेड्यात काढतो. पण त्यांच्या वागण्या-बोलण्यात सुसंगत तर्कसंगती असते, याचा कधी विचारही आपण करत नाही.



प्रदूषणाचे मानवावर होणारे परिणाम आपण जेव्हा विचारात घेतो तेव्हा सृष्टीतल्या इतर घटकांवर ते कसे होत असतील, याचा विचार हा कालसुसंगत, तार्किक विचार झाला. रेशमाचे किडे तुतीच्या झाडांची पानं पूर्वीच्या वेगानं खात नसतील, तर पानांवर प्रदूषणाचा परिणाम झाला आहे, हे निश्चित समजायला हवं. फुलांना पूर्वीचा सुगंध येत नसेल, तर आपल्या घ्राणेंद्रियांना काहीही झालेलं नसून फुलं प्रदूषणाला बळी पडली आहेत, हे लक्षात घ्यायला हवं........

नव्या-जुन्या विचारातला भेद मिटवण्यासाठी स्वागतार्ह विचारसरणी नक्कीच उपयुक्त ठरते. त्यासाठी कान, डोळे उघडे ठेवावे लागतात आणि नजरेवरचा चष्मा स्वच्छ काचांचा असावा लागतो. त्या चष्म्यावर गैरसमजाचं, अहंगंडाचं बाष्प धरलं तर विचारांचं प्रदूषण होऊ शकतं. म्हणून वरचेवर चष्माही पुसायला हवा. नवी पिढी किती, कसा विचार करते, याचा विचार आपल्या मनाशी ठेवला तर बाष्प धरणारच नाही. असे स्वच्छ चष्मे कुठं मिळतात, असं कुणी विचारल, तर कुठल्याही दुकानाचं नाव घेण्यापेक्षा मनात डोकावायला सांगायचं. मन स्वच्छ असेल तर नव्या पिढीचं कौतुक नक्कीच वाटेल आणि असं कौतुक वाटणं हा स्वागतार्ह विचारसरणीचा एक भाग म्हणायला हवा, नाही का?

# निष्णात कायदेपंडित श्रीहरी अणे

**राज्याच्या महाधिवक्तापदी निष्णात कायदेपंडित श्रीहरी अणे यांची नुकतीच नियुक्ती झाली आहे. स्पष्टवक्तेपणा हा स्वभाव आणि मूल्यनिष्ठांसाठी सक्रिय होणे ही त्यांची बांधिलकी आहे.**

सुनील मनोहर यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या महाधिवक्तापदावर फडणवीस सरकार नेमणूक केव्हा करणार, हा प्रश्न चर्चेचा विषय ठरला होता. घटनेने निश्‍चित केलेले हे पद रिक्त राहू नये, यासाठी जनहित याचिकाही दाखल झाली होती. या पदावर श्रीहरी अणे या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या निष्णात कायदेपंडिताची नेमणूक झाली आहे. स्वातंत्र्यलढ्यात अग्रणी असणारे आजोबा आणि स्वतंत्र भारताच्या प्रशासनात मोलाची भूमिका बजावणारे वडील हा त्यांचा वारसा. अणेंचा न्यायालयातला वावर हा त्यांच्या वादविवादपटुत्वाचा, बिनतोड युक्तिवादाचा आणि त्याच वेळी घटनेच्या सखोल अभ्यासाचा परिचय देणारा असतो. न्यायव्यवस्थेच्या मूल्यांना जपणारे अणे सार्वजनिक जीवनात वेगवेगळ्या स्वरूपात कायम अग्रेसर असतात. स्पष्टवक्तेपणा त्यांचा स्वभाव आणि मूल्यनिष्ठांसाठी सक्रिय होणे ही त्यांची बांधिलकी. या पदावर नियुक्ती करण्याचा ठराव मंत्रिमंडळाने केला, तेव्हा अणे यांनी 'सरकार आणि न्यायालय यांच्यात दुवा म्हणून आपण काम करू,' अशी प्रतिक्रिया दिली. त्यांचे हे विधान महत्त्वाचे तर आहेच; पण घटनेने मुक्रर केलेल्या महाधिवक्ता या पदाचे महत्त्व खऱ्या अर्थाने अधोरेखित करणारे आहे.



लोकशाहीच्या व्यवस्थेत विधिपालिका, कार्यपालिका व न्यायपालिका यांच्यात समतोल राहावा, अशी अपेक्षा तर व्यक्त केली जाते. पण प्रत्यक्षात संवादाचा समन्वय निर्माण करणारी यंत्रणा गृहीत धरली गेलेली असते. या तिन्ही प्रणालीतील सीमांचा योग्य तो मान राखत एकत्रितपणाचे नाते गुंफणे, हे जिकिरीचे काम टणत्कार टाळत विकासासाठी एकवाक्यता निर्माण करण्यात महाधिवक्तासारखी पदे महत्त्वाची ठरतात. महाराष्ट्रात हे पद भूषवणाऱ्या दरायस खंबाटांपासून व्ही. आर. मनोहर, भाऊसाहेब बोबडे अशा मंडळींनी सातत्याने या पदाची शान वाढवण्याची परंपरा आहे. अणे ही परंपरा आणखी पुढे नेतील, अशी खात्री या क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

सामान्यत: सत्तापरिवर्तन झाल्यानंतर पहिली काही वर्षे निर्णयात, धोरणात झालेल्या बदलांमुळे गाजतात. अशा वेळी नव्या सरकारच्या निर्णयांना न्यायालयात आव्हाने देण्याचा मार्ग चोखाळला जातो. शिवाय राजकारणात तो कमालीचा लोकप्रिय असतो. अशा वेळी महाधिवक्त्याचे पद अधिकच जबाबदारीने सांभाळावे लागत असणार. अणे यांच्या नियुक्तीवर राज्यपालांचे शिक्कामोर्तब होण्यापूर्वीच गोमांसबंदी कायदा, शिवसेनेचा दसरा मेळावा आणि सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवलेला डान्स बारबंदीचा कायदा अशा विविध विषयांवर त्यांना सरकारची भूमिका मांडण्यास प्रारंभ करावा लागला आहे. महाराष्ट्राच्या विभिन्न भागांत विकास आणि अनुशेषावरून निर्माण होणारे वाद हा कायदा अस्मितेचा मुद्दा ठरतो. वेगळ्या विदर्भाच्या मागणीसाठी आग्रही असणारे अणे नव्या भूमिकेचा तोल कसा सांभाळणार, याबद्दलही उत्सुकता आहे.

**– मृणालिनी नानिवडेकर**

## बोधकथा

एक नगर में रहनेवाले एक पंडितजी की ख्याती दूर-दूरतक थी। पासही के गाव में स्थित मंदिर के पुजारी का आकस्मिक निधन होने की वजहसे, उन्हे वहाँ पुजारी नियुक्त किया गया था। एक बार वे अपने गंतव्य की ओर जाने के लिए बस में चढे, उन्होने कंडक्टर को किराए के रुपये दिए और सीटपर जाकर बैठ गए।

कंडक्टर ने जब किराया काटकर उन्हे रुपये वापिस दिए तो पंडितजी ने पाया की कंडक्टरने उन्हे दस रुपये जादा दे दिए है। पंडितजी ने सोचा की थोडी देर बाद कंडक्टर को रुपये वापस कर दूंगा। कुछ देर बाद मनमें विचार आया की बेवजह दस रुपये जैसी मामूली रकम को लेकर परेशान हो रहे है, आखिर ये बस कंपनी वाले भी तो लाखों कमाते है, बेहतर है इन रुपयों को भगवान की भेट समझकर अपने पास ही रख लिया जाए। वह इनका सदुपयोग ही करेंगे।

मन में चल रहे विचार के बीच उनका गंतव्य स्थल आगया। बस से उतरतेही उनके कदम अचानक ठिठके, उन्होने जेब में हाथ डाला और दस का नोट निकाल कर कंडक्टर को देते हुए कहा ''भाई तुमने मुझे किराया काटने के बाद भी दस रुपये जादा दिए थे।'' कंडक्टर मुस्कुराते हुए बोला, ''क्या आपही गांव के मंदिर के नए पुजारी है?'' पंडितजी के हामी भरने पर कंडक्टर बोला ''मेरे मन में कई दिनोंसे आपके प्रवचन सुनने की इच्छा थी, आपको देखतेही खयाल आया की चलो देखते है की मै अगर ज्यादा पैसे दूँ तो आप क्या करते हैं। अब मुझे विश्वास हो गया की आपके प्रवचन जैसाही आपका आचरण है। जिससे सभी को सीख लेनी चाहिये'' बोलते हुए कंडक्टरने गाडी आगे बढा दी। पंडितजी बस से उतरकर पसीना-पसीना हो गये थे। उन्होने हाथ जोडकर भगवान का आभार व्यक्त किया, ''प्रभू तेरा लाख लाख शुक्र है जो तूने मुझे बचा लिया, मैने तो दस रुपये की लालच में तेरी शिक्षाओं की बोली लगा दी थी। पर तूने सही समयपर मुझे सम्हलने का अवसर दे दिया।

कभी कमी हम भी तुच्छ से प्रलोभन में, अपने जीवन भर की चरित्र पूंजी दांव पर लगा देते हैं।

**– गणेश गुर्जर, पुणे मो. ९८९०९९०११३**

VIJAY DIWAKAR DHAVLE
MFA

CONCEPT PRINTS
THE DESIGN STUDIO

AN AESTHETIC ESSENCE TO ADVERTISING

DOMINATION IN

- Pharmaceutical Product Promotional Printed Material, Visual-Aid, Literature, Folder, Brochure
- Packaging
- Conference Printed Material
- Publication

Cell : +91 9225219040 / 9225212384 / 9225852594
Email : vdhavle@rediffmail.com

Tilak Statue, Mahal, Nagpur - 440032

Plot 118, New Dnyaneshwar Nagar,Manewada Road, Nagpur - 440027

**सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा!**

# निलदिप केटरर्स

सौ. प्रज्ञा प्रकाश काणे
**दूरध्वनी : ०२५१–२४५२०५२**
**भ्रमणध्वनी : ९८१९३१२५६९**

शिवप्रतिमा मित्रमंडळ हॉल
डॉ. कामत हॉस्पिटल शेजारी, ममता हॉस्पिटलजवळ, निवासी विभाग, एम. आय. डी. सी., डोंबिवली (पू.)

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे : कोजागिरी गुणगौरव कार्यक्रम आणि बरंच काही...



**संस्थावृत्त**

**पुणे :** कऱ्हाडे ब्राह्मण संघ पुणे तर्फे दि. २५/१०/२०१५ रोजी कोजागिरी उत्सवाचा कार्यक्रम ‘श्रुति’ मंगल कार्यालय पुणे येथे साजरा करण्यात आला. दरवर्षी संघातर्फे इ. १० वी व इ. १२ वीमधील ८०% पेक्षा जास्त गुण मिळवणारे आणि महाविद्यालयातील उच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे गुण–गौरव करण्यात आला. प्रथमच सुरू केलेला ‘झाशी राणी पुरस्कार’ व गणित आणि संस्कृतमध्ये १००% गुण मिळवलेल्यांचाही पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पु. ल. देशपांडे या बहुआयामी व्यक्तीच्या सांगीतिक कार्यावर आधारित ‘स्वर सागरातील पु. ल.’ हा बहारदार दृकश्राव्य कार्यक्रम श्री यशोधन जटार यांच्या मैफल समूहाने सादर करून उपस्थित रसिकांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमात पु.लं.नी संगीत दिलेली, गायलेली, दिग्दर्शित केलेल्या चित्रपटातील विविध गाणी सादर करण्यात आली ‘मी तुमची झाले’ आणि माझं ठरल्यालं लगीन मोडलं’ या दोन ध्वनिमुद्रित गीताने सुरुवात झाली. त्यानंतर कबिराचे विणतो शेले, कुणी म्हणेल वेडा तुला, करु देत शृंगार, इथेच टाका तंबू, श्री हरी विदुरा हरी पाहुणा, इंद्रायणी काठी, बाई या पावसानं, माझे जीवनगाणे, तुझ्या मनात कुणी तरी, हसले मनी चांदणे, शब्दावाचून कळले सारे, माझिया माहेरा जा., पु.लं.ची हार्मोनियमवादनाची झलक दाखवण्यात आली; तसेच ही कुणी छेडिली तार हे गीत दृश्य स्वरूपात सादर केले. कार्यक्रमाची सांगता ‘पाखरा जा’ या गीताने करण्यात आली. सौ. मानिनी गुर्जर, ललित देशपांडे, सौ. आसावरी गुणे करमरकर यांनी ही गीते गायली व त्यास सौ. संपदा देशपांडे (हार्मोनियम), सौ. उमा जटार (व्हायोलिन), मंदार बगाडे (तबला) तालवाद्य आणि संयोजन श्री. यशोधन जटार यांनी केले. प्रथमेश व सौ. सायली जटार यांनी तयार केलेल्या दृक्‌श्राव्य सादरीकरणाचे संचालन सौ. दीपा पळसुले यांनी केले.

सौ. मानिनी गुर्जर यांनी ‘पसायदान’ सादर केल्यानंतर उपस्थित रसिकांनी भोजनाचा आस्वाद घेतल्यावर कार्यक्रम संपन्न झाला.

**ARUNDHATI KOPARKAR**
M.: 98811 57579

**AMOL KOPARKAR**
M.: 98222 95720

you dream it
we design it

**Our Services**

- Outdoor Catering Services
- Banquet Catering
- Other Banqueting Celebrations
- Corporate & Industrial Catering Services

**SHRIPAD NANIWADEKAR**
M.: 988220 32105

**SANJAY NANIWADEKAR**
M.: 98226 76293


॥ श्री ॥
नानिवडेकर बंधू यांचे ®
वरद
केटरर्स

**Our Services**

a. Traditional Catering
b. Other Traditional Fuctions
c. Marriage Halls Catering Services

**Regd. Office**
104, Mayuresh Apt.
Mayur Colony, Kothrud,
Pune - 411038.

# काळ आला होता; पण...



ही गोष्ट आहे १९५४–५५ सालातील. दिवस उन्हाळ्याचे. तेव्हा मी रत्नागिरीजवळील शिरगाव येथे नोकरी निमित्त राहत होतो. संध्याकाळी घराच्या पुढील अंगणात साधारणपणे अडीच फूट उंचीच्या टेबलावर बसून मुलीला खेळवत होतो. मी पाय खाली लोंबत ठेवले होते. आमचा खेळ रंगात आला होता. आपल्या पायाखाली काय चाललं आहे, याचा मला पत्ता नव्हता. एक विषारी नाग फणा काढून मांजराबरोबर खेळत होता, हे नंतर समजलं. आमचा खेळ सुरूच होता. आमच्या घर मालक लवाटे आजी बाहेरून आल्या. त्या अंगणाच्या फाटकात आल्या आणि एकदम 'काका' असं जोरात ओरडल्या.

मी दचकून उडी मारली. टेबलाखालचा देखावा पाहून माझी बोबडीच वळली. त्याचवेळी आमचा आरडाओरडा ऐकून नाग आणि मांजर बुजून पळताना दिसले. जीव भांड्यात पडला. भानावर आल्यावर जाणवलं, त्या वेळी माझ्या पायाचा स्पर्श नागाला झाला असता तर? त्यानं दंश केला असता तर? माझ्या पायाखाली फक्त दोन इंचावर त्याचा फणा होता म्हणे! त्या सगळ्या गोंधळात आजींचे आभार मानायचे राहूनच गेले. त्या आता हयात नाहीत. त्यांच्या स्मृतीला अभिवादन.

**– यशवंत हर्डीकर**

## हसा चकट फू

### सर्दीमुळे झाला कैदी

पहिला कैदी : तू इथे कसा आलास?
दुसरा : सर्दीमुळे!
पहिला : ते कसं काय?
दुसरा : शिंक आली आणि वॉचमन जागा झाला!

### काय करणार?

नवरा : अगं, एवढं तासभर दारात तू कुणाशी बोलत होतीस?
बायको : अहो, त्या शेजारच्या मालतीबाईशी, त्यांना आत यायला वेळ नव्हता.

### टेक्निक

डॉक्टर चिरंजीव : वेल डॅड – आता मी प्रॅक्टिस सुरू करणार आहे. एनी टिप्स फॉर सक्सेस?
डॉक्टर वडील : अस्पष्ट लिहीत जा आणि बिल मात्र स्वच्छ लिहीत जा!

**– श्री. केशव फडणीस, पुणे**


कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या ८१ व्या वर्षानिमित्त
हार्दिक शुभेच्छा !

**वसुधा एंटरप्रायजेस**
इंटरिअर डेकोरेटर्स
श्री. नंदकुमार सप्रे ९८८१२०८८४८

▪ फर्निचर ▪ प्लंबिंग ▪ पेंटींग ▪ फॅब्रिकेशन ▪ (ग्रिल्स, सेफ्टी डोअर) ▪ ॲल्युमिनिअम स्लायडिंग विंडोज ▪ पार्टिशन्स ▪ डोअर्स पीओपी फॉल्स सिलिंग ▪ लॉफ्ट टँक ▪ स्टेनलेस स्टील डासांच्या जाळ्या ▪ किचन ओटा एक्स्टेंशन ▪ वॉल टायलिंग ▪ फ्लोरिंग ▪ किचन ट्रॉलीज ▪ लॉफ्ट क्लोजींग ▪ संडास बाथरुम वॉटरप्रुफिंग ▪ बाथरुम रिनोव्हेशन ▪ सन कंट्रोल फिल्म ▪ वायरिंग ▪ पीव्हीसी फ्लोरिंग.

वसुधा एंटरप्रायजेस म्हणजे...
... सर्व सेवा एकाच छताखाली



With Best Compliments

**Dynamic Engineers**

7/2 Behind K.E.B Power Station
Udyambag – BELGAUM
590008

CMFRS. mechanical
(Railway) Jacks

P.M. Puranik
09448480607

# जीवन सौंदर्याचा साक्षात्कार घडविणारे राजकवी तांबे

## व्यक्तिपरिचय

जीवन सौंदर्याचे रसिक पूजक कै. भास्करराव तांबे यांचे स्मारक महाराष्ट्र उभारीत आहे. त्यांच्या रसिक चाहत्यांनी प्रसृत केलेले निवेदन वाचले व 'मराठी काव्याला सूर देणाऱ्या' या पहिल्या 'भावसंगीतकारा'च्या अनेक काव्यपंक्ती मनसागरी तरंगू लागल्या.

'घन तमीं शुक्र बघ राज्य करी,
रे खिन्न मना, बघ जरा तरी'

अनेकांच्या निराश मनात आशेचा अंकुर फुलविणाऱ्या त्या ओळीतील शब्द अंधाऱ्या रात्री लुकलुकणाऱ्या ''फूल हसे कांट्यांत बघ कसे,

काळ्या ढगिं बघ तेज रसरसे
तीव्र हिमांतुनि वसंतहि हंसे
रे, उघड नयन, कळ पळे दुरी'

आपले कौटुंबिक जीवन समाधानाने जगलेल्या या कवीच्या आशावादी मनांत उमटलेले हे भावतरंग. कै. तांबे यांचे सर्वच काव्य समाधान, आनंद व शांती यांनी भरलेले आहे. 'लोडाला टेकून लिहिलेले काव्य' असे वर्णन तांब्यांच्या कवितेचे केले जाते. त्यांच्या तृप्त जीवनाने घेतलेला हा शब्दाकार आहे. शृंगार हा त्यांच्या काव्याचा स्थायीभाव होता व प्रेम हा तर काव्याचा मुख्य विषय. परंतु दोन्हीकडे साफल्याच्या भावनेने कवीने पाहिल्यामुळे त्या नादमधुर शब्दब्रह्मांत इतकी उत्कटता आली की त्यामुळे 'रिकामे मधुघट' सदैव भरल्यासारखेच वाटले.

महाराष्ट्राबाहेर राहिलेल्या या कवीने एके काळी या भूमीला वेड लावले होते.


'डुमडुमत डमरू ये
खणकणत शूल ये
शंख फुंकीत ये
येई रुद्रा!'

भारताच्या तेजस्वितेला आवाहन करणारी ही कविता कवीच्या प्रकृतीपेक्षा आगळी असूनही ओजस्वी भाषा व स्वातंत्र्याबद्दलची उत्फुल्ल भावना यामुळे सर्वांची मने तिने जिंकून घेतली होती.

कै. तांबे यांनी कविता लिहिल्या त्या स्वतःच्या समाधानासाठी. त्या कधी एका वहीत त्यांनी लिहून ठेवल्या नाहीत की कुणाकडे प्रकाशनाला त्यांनी पाठविल्या नाहीत. 'घरी लोळती जरो राज:कण' असेच या कवितांचे तांब्यांच्या घरी स्थान होते. ज्या मित्राला जी कविता आवडे ती तो घेऊन जाई. तांब्यांचे एक निकट मित्र कै. वासुदेव गोविंद आपटे यांनी स्वत:बरोबर आणलेल्या काही कविता पुण्याच्या मासिकांतून कवीला न सांगतां छापावयास सुरुवात केली तेव्हा महाराष्ट्राला तांबे यांचा परिचय झाला. ऑक्टोबर १८९८ च्या 'काव्यरत्नावलीं'त 'विधवेचें स्वप्न' ही कविता प्रथम प्रसिद्ध झाली व नंतर नोव्हेंबरमध्येच 'झरा' ही त्यांची दुसरी कविता प्रकाशित झाली.

ग्वाल्हेर संस्थानांतील मुगावली हे या कवीचे जन्मस्थान आणि देवास हे या कवीचे स्फूर्तिस्थान. कवी काळेले हा जन्मदिन २७ ऑक्टोबर १८७३ असा देतात. १८९३ मध्ये कविवर्य तांबे देवासच्या पाठशाळेत मास्तर झाले. नंतर देवासच्या राजपुत्राचे शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक झाली. या राजपुत्रासाठी 'चिव चिव चिमणी छतांत' हे बालगीत जन्मले व लहान मुलांच्या पुस्तकात त्याने आज कायमचे स्थान मिळविले आहे. देवासचा निसर्गरम्य परिसर, उज्जयिनीची क्षिप्रा, इंदूरचे खानदानी वातावरण, प्रतापगडची स्वस्थता यामुळे त्यांच्या काव्याने दरबारी बैठक घेतली व नंतर त्याला खरी मुलायम झालर लावली ती त्यांच्या पत्नीने.

१८९७ मध्ये त्यांचा विवाह झाला व 'डोळे हे जुल्मि गडे, रोखुनि मज पाहू नका' असे भावपूर्ण काव्य विवाहापूर्वीच लिहिणाऱ्या या कवीच्या शब्दांना नवे पंख फुटले. 'स्पर्शें सखीच्या अमर जहालों, मला न तुमचा हेवा, यापासून 'सुफलित झाले गे सखि जीवित' असे कृतार्थ उद्‌गार तांबे यांनी काढून आपल्या समाधानी जीवनाची जणू पावती आपल्या पत्नीला दिली. गोविंदाग्रजांना प्रेमाचे शाहीर म्हटले जाते तसे तांबे यांनाही म्हटले पाहिजे, असे अनेक टीकाकार आज म्हणत आहेत. 'गुलाबी कोडें' सारखे 'कुणी कोडें माझें उकलिल का?' अशी समभावना



**'कौटुंबिक कवी' भास्करराव तांबे**
**'सुफलित झाले गे सखी जीवित'**

व्यक्त करणारी कविता तांबे यांनी १९२० मध्ये लिहिली.

'हृदयिं तुझ्या सखि, दीप पाजळे
प्रभा मुखावरि माझ्या उजळे;
नवरत्नें तूं तुज भूषविलें,
मन्मन खुललें आंतिक कां?
गुलाब माझ्या हृदयीं फुलला,
रंग तुझ्या गालांवर खुलला;
कांटा माझ्या पायीं रुतला,
शूल तुझ्या उरिं कोमल कां?'

सौंदर्याच्या या उपासकाला हा प्रेमाचा बहर पाहून कृतकृत्य झाल्यासारखे वाटले असावे. या प्रेमालाही त्यांनी सौंदर्याच्या कोंदणात बसविले. त्यामधून स्त्रीच्या मांगल्याचे उत्कट दर्शन त्यांना झाले व प्रेमगीते गाणारा हा कवी,

'भयचकित नमावें तुज रमणी
जन कसे तुडविती तुज चरणीं'
असे म्हणू लागला.

मध्य प्रदेशातील प्रतापगड मुक्कामी १९२० मध्ये त्यांनी ही कविता लिहिली. पोलीस प्रमुख व न्यायाधीशाच्या जागेवर ते तेथे त्या वेळी काम करीत होते. 'कौटुंबिक कवि' म्हणून महाराष्ट्र त्यांना ओळखत होता व कवीच्या प्रतिभेला अगदी नव्याने बहर आलेला होता. १९१० ते १९१७ या सात वर्षांत तांबे यांनी एकही कविता लिहिली नव्हती व १९२० या एका वर्षात त्यांनी ३३ कविता लिहिल्या. आणि याच वर्षी कवी वा. गो. मायदेव यांनी तांबे यांच्या इतस्ततः विखुरलेल्या कविता स्वत: हिंडून,

वृत्तपत्रांत जाहिराती देऊन मिळविल्या व त्यांचा हा पहिला संग्रह महाराष्ट्राला सादर केला. तांबे यांची स्मरणशक्तीही दांडगी होती. त्यांनी या प्रतापगड मुक्कामी ५० कविता सीतारामपंत देव यांना पाठ म्हणून लिहून घेतल्या. कवी मायदेव प्रतापगडपर्यंत जाऊन आले व सर्व कविता तांब्यांकडून त्यांनी तपासून घेतल्या. कवी मायदेवांनी हे परिश्रम घेतले नसते तर तांबे यांच्या कविता वाऱ्यावर उडून गेल्या असत्या. 'सरोवरें व कमळें' ही त्यांनी लिहिलेली प्रेम–गीतावली कधी मिळालीच नाही. पुण्याचे श्री. दि. ग. केळकर (कवि आज्ञातवासी) यांनी १९२७ मध्ये त्यांच्या कवितांचा दुसरा संग्रह प्रकाशित केला. १९३४ मध्ये कविवर्य तांबे यांची षष्टचब्दी अनेक ठिकाणी साजरी झाली व त्या निमित्ताने माधव ज्युलियन यांनी संपादित केलेला त्यांच्या समग्र कवितांचा संग्रह प्रकाशित झाला. चाहत्यांनी जगविलेले हे काव्य अशा तऱ्हेने संपूर्णपणे तांबे यांच्या हयातीतच जनतेसमोर आले. 'माझ्या कविता लोकांपुढे ठेवून कवी म्हणून मिरवावे असे कधी मला स्वप्नही पडले नाही' असे लिहिणाऱ्या या कवीला महाराष्ट्राने डोक्यावर घेतले. मायदेवांनी स्वत: गाऊन त्या कवितांची गेयता सर्वांच्या नजरेस आणून दिली. उत्कट भावनेचा गेय आविष्कार तांब्यांच्या कवितांइतका इतरत्र आढळणे कठीण होता. 'तें दूध तुझ्या घटांतलें', 'नववधू प्रिया मी बावरतें', 'घट तिचा रिकामा झऱ्यावरी' या भावगीतांच्या ओळी नभोवाणीवर रोज ऐकूनही अजून निर्जल झालेल्या नाहीत. त्यांच्यांतील तरल भावना कोमेजलेल्या नाहीत. १९३५ मध्ये ग्वाल्हेर नरेशांनी त्यांना 'राजकवी' बनविले व संस्थानी वातावरणात मोहरलेल्या त्यांच्या कविजीवनाची त्यात सांगता झाली.

निर्मळ मनाच्या या कवीला मृत्यूची चाहूल अजमेर मुक्कामी १९२१ सालीच लागली होती. जिवावरच्या दुखण्यातून ते तेव्हा बरे झाले होते. तांबे यांच्या काव्याचा रंगही या दुखण्यानंतर पालटला. परंतु हा कवी अखेर आपल्या मूळ प्रवृत्तीवर गेला व मरणांतही तो सौंदर्य शोधू लागला. 'महाप्रस्थान' या अभिधानाखाली त्यांच्या काही कविता प्रसिद्ध झाल्या तेव्हा रसिकांना गूढगुंजनाचा भास होऊं लागला. परंतु कवी रा. अ. काळेले म्हणतात त्याप्रमाणे 'सौंदर्य मृगया हाच तांब्यांच्या काव्यांतील खरा गूढवाद ठरला.'

''रतलें परपुरुषाशीं रे,
मी रतलें परपुरुषाशीं
मधुर मुरलिसुर हलवुनि
भरभर ओढिती या चरणांशी''

हे चरण मृत्यचे आहेत. 'मला येथला लागला लळा, सासरी निघतां दाटतो गळा' असेही ते मृत्यूला सांगतात. आणि त्याचबरोबर,

'जन पळभर म्हणतील हाय हाय!
मी जातां राहील कार्य काय?'

अशी वास्तव भाषा कारून ते म्हणतात,

'सूर्य तळपतिल चंद्र झळकतिल;
तारे आपुला क्रम आचरतिल
असेच वारे पुढें वाहतील,
होईल कांहिं कां अंतराय'

परंतु याबद्दल कवीला खेद नाही. १९२१ च्या आजारानंतरच त्यांनी 'मरणांत खरोखर जग जगतें' ही अमर कविता लिहिली. मृत्यूचे तेव्हा घेतलेले ते उदात्त दर्शन त्यांनी शब्दरूप केले.

'अनंत मरणें आधीं मरावी
स्वातंत्र्याची आंस धरावी
मारिल मरणचि मरणाभावी
मग चिरंजीवपण यें बघ तें'

अखेरचे दिवस तांबे मुलाकडे ग्वाल्हेरी होते. १२ नोव्हेंबर १९४१ रोजीं तांब्यांनी आपली शेवटची कविता लिहिली. १९३५ पासूनच आपल्या कवितेचा बहर संपला हे त्यांना जाणवत होते व म्हणून पुण्याच्या रसिक संपादकाने कवितेची मागणी करताच दोन वर्षांपूर्वी लिहिलेली 'रिकामे मधुघट' ही कविता त्यांनी पाठविली.

''मधु मागशि माझ्या सख्या, परी
मधुघटचि रिकामे पडति घरीं''

असे आपले हृद्गत मोकळे करून कवीने निरवानिरवीची भाषा याच कवितेत केली.

'ढळला रे ढळला दिन सखया
संध्या छाया भिवविति हृदया,
आतां मधूचें नांव कासया?
लागले नेत्र रे पैलतिरीं?'

१९३३ पासून पैलतीरावर नजर लावून बसलेला हा समाधानी कवी तितक्याच शांतपणे ग्वाल्हेरी ७ डिसेंबर १९४१ रोजी अनंताच्या शोधात निघून गेला. त्यानंतर २० वर्षांनी मराठी रसिकांनी या कवीचे कायमचे स्मारक उभारण्याचा संकल्प सोडला. महाराष्ट्राबाहेर राहून मराठी सारस्वताची महती वाढविणाऱ्या या साहित्यसेवकाचे महाराष्ट्रावरचे ऋण फार मोठे आहे. आनंदाचे, आशेचे स्फुल्लिंग चेतविणाऱ्या या राजकवीचे स्मारक हे आमच्या रसिकतेचे प्रतीक आहे.

## पत्र प्रतिसाद

संपादक महोदय 'संपर्क' यांस
सप्रेम नमस्कार

'संपर्क'चा दसरा दिवाळी अंक अथ ते इति वाचून काढला. मला फार आवडला हे सांगणे नलगे.

अंकातील सर्व साहित्य दर्जेदार व सकस आहे. अग्निहोत्राबद्दलचा लेख सर्वोत्तम आहे. शास्त्रीय निकषांवर सिद्ध झालेला परिणाम मी मी म्हणणाऱ्यांनाही आश्चर्यचकित करेल. कोणासही हे थोतांड आहे किंवा अंधश्रद्धा आहे, असे म्हणून नाके मुरडता येणार नाही.

कै. श्री. शं. ना. नवरे या प्रतिथयश लेखकावरील लेख, शिवथर घळीची चक्षुर्वैसत्य माहिती वगैरे सर्व अंकाला एका साहित्यिक उंचीवर नेतात. त्यामुळे दीपावलीच्या या अक्षर फराळाबद्दल आभार मानावे तितके थोडेच.

सर्व ज्ञातिबांधवाना माझी एक सूचनावजा नम्र विनंती आहे, की त्यानी त्यांचेकडील उपयुक्त माहिती, फोटो, वगैरे संपादकांकडे महिनाभर आधीच द्यावी, म्हणजे त्यातील निवडक व योग्य तेवढे त्यांना अंकात समाविष्ट करता येईल. असो! अंकाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

आपला नम्र,
**य. वि. हर्डीकर**
(मो. ९३७३५९९०८४)

nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - **+91251 2482106, +91251 2483476.**
•**SHOP NO.1:** Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - **97026 55000.**
•**SHOP NO.2:** Everest Shopping Center, Phadke Rd, Dombivli (E)-421201. Tel - **+91251 2433193. Mo. - 9702811122.**

Shubhmangal
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) **0251 - 2860720, 9702666000**, Fax: **2483351.**
Email: ynakhye@gmail.com
Website: **www.shubhamangalhall.com**

EVEREST
HALL

AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: **9702622000, 9702011131**

EVEREST
DISTRIBUTORS

**DISTRIBUTORS FOR**
Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico),
Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: **+91 251- 2483476, 2482106.**
Fax: **+91 251- 2483351**. Email: **anakhye@gmail.com**

finVantage

EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO,
Mutual Fund, Realty, Life and General Insurance,
PMS and Financial Planning Advisory

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everst House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: **91251 2480305**

# 'मन्नाडे'

दोन दिवसांपूर्वी विविधभारतीच्या छायागीत कार्यक्रमात 'वक्त' चित्रपटातील 'ए मेरी जोहराजबीन' हे गाणे लागले होते. साहिर यांचे शब्द, रवीचे संगीत, मन्नाडेचा आवाज, बलराज सहानीचा अभिनय व अलका सचदेव यांचे लाजवाब लाजणे यामुळे हे गाणे लोकप्रिय झाले. अशाच एका एकसष्टी समारंभाला मी हजर होतो. उत्सवमूर्ती हेच गाणे गात होती. गायक मन्नाडेचा विषय निघाला. माझ्या सहकाऱ्याने हा मन्नाडे कोण, असा प्रश्न भाबडेपणाने केला. मी त्याची चेष्टा करण्याच्या उद्देशाने म्हणालो, जसे एन. दत्ता, सी. रामचंद्र, तसे मन्नाडे. त्याचे समाधान झाले नाही. त्याला गोंधळात टाकण्यासाठी मन्नाडे म्हणजे मनोहर नारायण डेंगळेकर असे सांगितले. त्याचे समाधान झाले. तो बरेच दिवस मन्नाडे म्हणजे मनोहर नारायण डेंगळेकर या भ्रमात होता. यातला विनोदाचा भाग सोडला तरी चित्रपटसृष्टीत साठ वर्षे घालवल्यावर मन्नाडे सगळ्यांना अपरिचित आहेत.

उन्हाळ्याची सुट्टी लागली की, सगळ्यांना मामाच्या गावाचे वेध लागतात. या वेळी आकाशवाणीवर झुकु झुकु अगीनगाडी बरोबर, अ आ आई, म म मका, मी तुझा मामा दे मला मुका, हे गाणे लागते. सुट्टी संपते, पावसाळा सुरू होतो. घन घन माला नभी दाटल्या हे गाणे पावसाला संपेपर्यंत ऐकायला मिळते. ही दोन्ही गाणी गायक मन्नाडे यांनी गायली आहेत. मन्नाडे यांनी मराठीत मोजकीच गाणी गायली आहेत. त्यातली ही दोन गाणी विशेष गाजली.

प्रख्यात अंध पार्श्वगायक व संगीतकर के. सी. डे यांचा मन्ना हा पुतण्या. त्यांचे नाव प्रबोध चन्द्रडे, पण ते त्यांचे टोपणनाव मन्नाडे म्हणूनच ओळखले जातात. त्यांचा जन्म १ मे १९१९ ला कलकत्याला झाला. हा पुतण्या काकांच्या वळणावर गेला. काकांच्या सांगण्यावरून जन्मगावी कलकत्याला त्यानी उस्ताद दबीरखान यांच्याकडे संगीताचे धडे घेतले. १९४२ साली काकांबरोबर मन्ना मुंबईला आला व



मुंबईत रमला. काकांचे संगीत असलेल्या चित्रपटाना तो साहाय्यक असायचा. मन्नाडेनी खेमचंद्र प्रकाश, अनिल विश्वास व एस. डी. बर्मन यांच्याकडे साहाय्यक म्हणूनही काम केले. त्यांनी सुरुवातीच्या काळात काही चित्रपटांना संगीत दिले, पण त्यात त्यांचे मन रमले नाही. एस. डी. बर्मनच्या 'मशाल'मध्ये गायलेले 'उपर गगन विशाल' हे गाणे गाजले व नवीन पार्श्वगायक म्हणून मन्नाडेचा हिंदी चित्रपटसृष्टीत दमदार प्रवेश झाला.

रफी, मुकेश व किशोरकुमार या पुरुष गायकांनी हिंदी चित्रपट संगीताचा सुवर्णकाळ या तिघांबरोबर मन्नाडे, हेमंतकुमार व तलत मेहमूद यांनीही आपले वेगळे स्थान निर्माण केले. मन्नाडेचा आवाज पहाडी, कमावलेला व गळा कमालीचा तयारीचा होता, पण त्यांचे दुर्दैव असे की, ते कुणाचेच लाडके नव्हते व त्यांचा आवाज कोणत्याही नटाशी जोडला गेला नाही. दिलीपकुमारसाठी रफी, राजकुमारसाठी मुकेश व देवानंदसाठी किशोरकुमार वाटले गेल्यामुळे प्रत्येक संगीतकारांनी मन्नाडे यांचा मोजकाच वापर केला. शंकर-जयकिसननी त्यांचा जास्त उपयोग केला. तू प्यार का सागर है (सीमा), तलत मुसाफिर (तीसरी कसम), दिल का हाल सुने दिलवाला (श्री ४२०), नैन मिले चैन कहाँ (बसंत बहार) सारख्या गाण्यात मन्नाडेचा वापर केला. चोरी चोरी या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. या चित्रपटाचा नायक राज कपूर असताना, यातील सर्व गाणी मुकेशऐवजी मन्नाडे यांना देण्याची शंकर-जयकिसननी कल्पकता दाखवली. चोरी चोरीमधील सर्व गाणी तुफान गाजली, पण मन्नाडेना फारसा फायदा झाला नाही. नंतर शंकर-जयकिसननी राज कपूरसाठी मन्नाडेना अनाडी, तीसरी कसम व मेरा नाम जोकर (ए भाई जरा देखते चलो) मधील मोजकीच गाणी दिली.

रागदारीतील गाण्यासाठी मात्र सगळ्या संगीतकारांची पहिली पसंती मन्नाडे यांची असायची. पण त्यामुळे त्यांच्यावर शास्त्रीय संगीतावरील गाणी गाणारा हा शिक्का बसला व हा शिक्का ते शेवटपर्यंत पुसू शकले नाहीत. त्यांचा गळा कमालीचा तयारीचा होता, तरी पण त्यांच्याकडे रोमँटिक, दर्दभरी गाणी खूपच कमी आली. दिल ही तो है (रोशन), देख कबीरा रोया (मदन मोहन), तेरी सुरत मेरी आँखे (एस. डी. बर्मन), संगीत सम्राट तानसेन (एस. एन. त्रिपाठी), सीमा, बसंत बहार (शंकर-जयकिसन), सती सावित्री (लक्ष्मीकांत प्यारेलाल) यांनी मन्नाडेना शास्त्रीय गाणी दिली. लागा चुनरी में दाग, पूछोना कैसे मैन, तू प्यार का सागर है, तुम गगन के चंद्रमा, ही गाणी विशेष गाजली. विनोदी धाटणीची रागदारी गाण्यात मन्नाडेनी धमाल उडवली. 'पडोसन'मधील 'एक चतुर नार है' हे गाणे त्याचे उत्तम

उदाहरण आहे.

याल्ला याल्ला दिल ले गयी, प्यार हुवा इकरार हुवा, मस्ती भरा है समा, आजा सनम, ये रात भीगी भीगी, मेरे दिल में एक बात, नैन मिले चैन कहाँ, ऐ मेरी जोहराजबीन सारखी रोमँटिक गाणी देऊन ही मन्नाडे रागदारीच्या शिक्क्यातून बाहेर पडू शकले नाहीत. संगीतकार रोशन यांनी मन्नाडेंच्या कव्वालीसाठी सुरेख वापर केला. 'बरसात की एक रात'मधील 'इष्क इष्क है' ही कव्वाली तुफान गाजली. संगीतकार रवीचे 'तुझे सूरज कहूँ या चंदा' (एक फूल दो माली) हे गाणे लोकप्रिय झाले. संगीतकार कल्याणजी-आनंदजींनी मन्नाडेचा आवाज प्रसिद्ध खलनायक प्राणसाठी वापरला. कस्मे वादे प्यार वफा सब (उपकार) व जंजीर चित्रपटातील कव्वाली 'यारी है इमान मेरा' तुफान गाजली.

२४ ऑक्टोबर २०१३ रोजी मन्नाडे यांचे निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ९५ वर्षांचे होते. मन्नाडेना त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत भरपूर पारितोषिके मिळाली. केंद्र सरकार व राज्य सरकारनी त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली. २००७ मध्ये दादासाहेब फाळके हा सर्वोच्च पुरस्कार केंद्र सरकारने दिला. तसेच त्यांना १९७१ मध्ये पद्मश्री व २००५ मध्ये पद्मभूषण या पुरस्कारांनी केंद्राने त्यांचा सन्मान केला. १९६९ मध्ये 'मेरे हुजूर'मधील गाण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट गायक म्हणून पुरस्कार मिळाला. १९७२ मध्ये 'मेरा नाम जोकर'मधील गाण्यासाठी त्यांना फिल्मफेअर पारितोषक मिळाले.

आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रदीर्घ कारकिर्दीत ते रफी, मुकेश व किशोरकुमारसारखा ठसा उमटवू शकले नाहीत. ते प्रत्येक संगीतकाराकडे गायले, प्रत्येक नटाला आवाज दिला, तरी पण त्यांचे नाव कुठल्याही संगीतकाराला व नटाला जोडले गेले नाही, हेच त्यांचा ठसा न उमटवण्याचे प्रमुख कारण आहे. कोणा संगीतकाराचे लाडके नव्हते, तसेच कोणताही गायक मन्नाडेसाठी आग्रही नव्हता.

प्राण यांचा खलनायक ही भूमिका नसलेला 'उपकार' हा पहिला चित्रपट. या चित्रपटात प्राण यांच्या तोंडी एक गाणे आहे. 'कस्मे वादे प्यार वफा' हे गाणे प्रत्यक्ष किशोरकुमार गाणार होते, पण हे गाणे ऐकल्यावर किशोरकुमार लगेच म्हणाले की, हे गाणे फक्त मन्नाडेच योग्य रीतीने गाऊ शकतील. हे गाणे कमालीचे लोकप्रिय झाले, पण मन्नाडेना काहीच फायदा झाला नाही. ते नेहमीप्रमाणे दुर्लक्षित राहिले. कारण अंदाज चित्रपटातील मुकेश यांनी एका गाण्यात म्हटल्या प्रमाणे 'किसको बनाना किसको मिटाना इस नगरीकी रीत' याचा अनुभव मन्नाडेना प्रत्येक क्षणी आला. हीच त्यांची जीवनकहाणी आहे.

**– दीपक दीक्षित, बेळगाव**
**मोबा : ७८९९२३५७६०**


# VIDISHA ENTERPRISES

Tally Partner

**We provide all Services for Tally Accounting Software**

21/272, Yamunanagar,
Nigdi, Pune - 411 044

**Mob.** : +91-9970156307
**Tel.** : +91-20-27660748
**Email:** meghanathakur@yahoo.com


## विचारधन

सज्जन व्यक्ति के साथ मित्रता
उस गन्ने के समान होती है, जिसे
आप कितनाही तोडो, दबाओ, चूसो,
यहाँ तक कि उसे
पीसकर ही डालो,
हर बार उस में से केवल और केवल
मिठास ही निकलती है।

---

कोणी तुम्हाला मागे खेचत असेल
तर तुम्ही खूप पुढे जाणार आहात
कारण धनुष्याचा बाण दूरवर जाण्यासाठी
आधी मागे खेचावा लागतो


॥ रेशीम गांठी ॥®
करिष्मा समोर, कोथरूड, पुणे ३८.
**माफक फी, वेबसाईट फ्री**
☎ २५४६९११८ / ९८८११५२७४६
वेळ : सकाळी १० ते १२, सायं. ५ ते ८ बुधवारी बंद
e-mail : info@reshimgathi.com
visit : www.reshimgathi.com
**सुखी वैवाहिक जीवनासाठी समुपदेशन**

वधू-वर नोंदणी
पत्रिका, भविष्य
आणि
परिचय मेळावे

# शंकरशेठ शिष्यवृत्तीचे पहिले मानकरी : यशवंत वासुदेव आठल्ये



**'मरतानाहि मातु:श्री मजवर उपकार करून गेली.'**

'मुंबई विद्यापीठ आणि जगन्नाथ शंकरशेट' हा लेख 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रकाशित होताच एक स्त्री एक पुस्तक घेऊन कचेरीत दाखल झाली. संस्कृत शिष्यवृत्त्यांची ही उज्वल परंपरा महाराष्ट्रात ज्यांच्यापासून सुरू झाली त्या विद्वान पंडिताची ती नातसून होती. १८६६ मध्ये पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती ज्यांनी मिळविली त्या कै. यशवंत वासुदेव ऊर्फ बापूसाहेब आठल्ये यांचे चरित्र तिने संपादकांच्या स्वाधीन केले. वृत्तपत्राच्या कचेरीत काही विषय चालून येतात ते हे असे. आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाबद्दलची उदात्त भावना कुणाला अशी सहज ओढून आणते.

जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीच्या या पहिल्या मानकऱ्याचे चरित्र लिहिले आहे तेही एका असामान्य लेखकाने. रियासतकार सरदेसाईंनी अतिशय जिव्हाळ्याने कै. बापूसाहेब आठल्ये यांच्या जीवनाचे विविध पैलू उकलून दाखविले आहेत. माझे जीवन बापूसाहेबांनीच घडविले, असे सांगून त्यांच्या मोठेपणाचा एकच दाखला त्यांनी दिला आहे. ''लोकमान्य टिळक कै. आठल्ये यांना गुरुस्थानी मानीत आणि हरएक बिकट प्रसंगी प्रथम ते त्यांचा सल्ला घेत, ही एकच गोष्ट बापूसाहेबांची खरी योग्यता सिद्ध करण्यास पुरेशी आहे.'' असें त्यांनी म्हटले आहे.

अशी ही व्यक्ती होती तरी कोण? ख्यातनाम कायदेपंडित व सयाजीराव गायकवाडांचे नायब दिवाण म्हणून ज्यांचे नाव गाजले ते हे बापूसाहेब आठल्ये मूळ शिपोशीचे. १८५१ मधला रत्नागिरीचा त्यांचा जन्म. वडील वासुकाका आठल्ये हे शिपोशीचे इनामदार व अतिशय बुद्धिमान कायदेपंडित. त्यांच्या विद्वत्तेचा वारसा चिरंजीवाने घेतला व संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर शालेय जीवनात त्यांनी प्रभुत्व मिळविले. 'बापूच्या लेखनात आम्हा शिक्षकांची पेन्सिल कधी शिरकत नसे. चूक व्हायची नाही मग पेन्सिल कशाला वापरायची?' अशी आठवण त्यांच्या एका शिक्षकाने नमूद करून ठेवली आहे. उत्तरपत्रिकेतील मूळ मजकूर शोधावा लागणाऱ्या आजच्या अनेक विद्यार्थ्यांना हा अनुभव अतिशय विचित्र वाटेल. १८६५ मध्येच ते मॅट्रिक परीक्षेला बसायचे होते; परंतु त्यांची आई अतिशय आजारी झाली व त्या दुखण्यातच तिचा अंत झाला. कै. बापूसाहेब आठल्ये यांची परीक्षा चुकली.

परंतु तोही अखेर एक योगायोग ठरला. 'मरतांनाहि मातु:श्री मजवर उपकार करून गेली.' असे त्यांनी म्हटले आहे. कारण जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती १८६५ मध्ये सुरूच झालेली नव्हती. १८६६ मध्येच ती जाहीर झाली व कै. आठल्ये यांना पहिल्या मानकऱ्याचा हा सन्मान मिळाला. त्यावेळी रत्नागिरी हायस्कूलचे मुख्याध्यापक डॉ. भांडारकर होते. या जोडीचे गुरू-शिष्याचे नाते तेथे जे निर्माण झाले ते अखंड टिकले. जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती दरवर्षी मिळाली पाहिजे, ही ईर्षा रत्नागिरीच्या शाळेत निर्माण झाली ती या यशवंताच्या पहिल्या यशानेच. रत्नागिरी व सांगली यांच्यामधील चुरस गेल्या शतकात अनेकदा रंगली. तेथील विद्यार्थी व शिक्षक यांच्या प्रतिष्ठेचा तो प्रश्न बनला व त्यामधून संस्कृत पंडितांची एक मालिकाच महाराष्ट्रात तयार झाली. राष्ट्रीय भाषांच्या मायभाषेचे खरे संवर्धन या जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्तीने केले. त्या चळवळीचे पहिले पाइक म्हणजे कै. बापूसाहेब आठल्ये.

त्यावेळचे एल्फिन्स्टन कॉलेज म्हणजे ज्ञानाची खरी पाणपोई होती. १८६७ मध्ये बापूसाहेब आठल्ये या कॉलेजात दाखल झाले. डॉ. भांडारकर संस्कृतचे प्राध्यापक म्हणून तेथे होतेच. त्यांच्या मार्गदर्शनाचा व नामदार तेलंग यांच्या सहवासाचा लाभ आठल्यांना झाला. आपल्या या विश्वविद्यालयीन जीवनात कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर बापूसाहेब आठल्ये यांनी अनेक पारितोषिके मिळविली. गणित विषय घेऊन ते बी.ए. झाले व पहिले आले. संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषा घेऊन एका वर्षात ते एम.ए. झाले. १८७१ मध्ये त्यांची सीनियर फेलो म्हणून नेमणूक झाली. महादेव गोविंद रानडे हे त्या वेळीं तेथे इंग्रजीचे प्राध्यापक होते. ते रजेवर गेले तेव्हां बापूसाहेब आठल्ये यांना त्यांचे काम देणे नियमाने जरूर होते. परंतु तसे झाले नाही. तेव्हा त्यांनीं प्रिन्सिपल ऑक्झेनहॅन यांच्याकडे तक्रार केली. 'तुम्ही संस्कृतचे तज्ज्ञ, इंग्रजीचे काम तुम्हांस कसे द्यावे,' असा प्रतिप्रश्न त्यांना टाकला गेला. ''संस्कृत भाषेत बक्षिसे होती, तशी इंग्रजीत असती तर तीही मी मिळविली असती, संस्कृतपेक्षाही इंग्रजीवर माझे प्रभुत्व जास्त आहे,'' असे त्यांनी आत्मविश्वासपूर्वक उत्तर दिले. गुणग्राहकतेचा तो काळ होता. दुसऱ्या दिवशीच न्या. रानडे यांच्या जागी त्यांची नेमणूक झाली.

परंतु अशक्त प्रकृतीने त्यांना अधिक जबाबदारीची कामे अंगीकारू दिली नाहीत. हवामानाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल अशी, कोल्हापूरजवळच्या कागल जहागिरीचे मालक आबासाहेब घाटगे यांचे शिक्षक म्हणून, त्यांनी नोकरी पत्करली. अल्पावधीत आपल्या विद्वत्तेची छाप त्यांनी तेथे पाडली व आठ महिन्यांत कोल्हापूर छत्रपतींचे 'गार्डियन' म्हणून नेमणूक झाली. येथे नाव मिळाले होते, परंतु कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढत होत्या म्हणून त्यांनी वकिलीची परीक्षा देऊन मुंबई हायकोर्टात हजर होण्याचा निर्णय घेतला. एलएल.बी. च्या परीक्षेतही त्यांनी ॲर्नाल्ड पारितोषिक मिळविले. १८७६ मध्ये त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला व बापूसाहेबांच्या

जीवनाचे दुसरे पर्व सुरू झाले.
वकिलीच्या व्यवसायामुळे ते मुंबईत राहिले. त्यामुळे त्या काळच्या या नगरातील सामाजिक चळवळींशी त्यांचा संबंध येऊ लगला. विश्वनाथ नारायण मंडलिक यांच्याशी आठल्ये कुटुंबीयांचा जुना ऋणानुबंध. त्यांच्या आग्रहावरून 'मनुस्मृति' ग्रंथाचे संशोधन व पुनर्मुद्रण बापूसाहेबांनी केले. मुंबईच्या ब्राह्मण सभेचे तेच एक संस्थापक. अनेक संस्थांचे चिटणीस म्हणून त्यांनी येथे कामे केली. भांडारकर पितापुत्र, काशिनाथपंत तेलंग, मंडलिक जिनसीवाले, लक्ष्मण रामचंद्र वैद्य, वामन शिवराम व महादेव चिमणाजी आपटे ही सर्व मंडळी बापूसाहेबांच्या रोजच्या बैठकीतील. लोकमान्य टिळकांचे तर नंतर ते एक प्रमुख सल्लागार झाले.
परंतु त्यांच्या कौटुंबिक जीवनात अतिशय अशांतता होती. पत्नी निवर्तली. दोन मातब्बर बंधू अल्पायुषी ठरले. विषण्ण मनाने प्रकृतीही खालावू लागली. कोर्टातही त्यांना जाववेना. अशा परिस्थितीत असताना बडोद्याहून सयाजीराव महाराजांची हाक आली व बापूसाहेब आठल्ये बडोदे संस्थानचे न्यायाधीश म्हणून २५ मार्च १८८७ रोजी रुजू झाले. तेथे अनेक खटले वर्षानुवर्षे पडून होते. वर्षाच्या आत सर्व काम बापूसाहेबांनी निकालात काढले. त्या वेळी बडोद्यास कोणतेही कायदे नव्हते. न्यायाधीश मर्जीप्रमाणे निकाल देत. संस्थानाच्या प्रमाणे निकाल देत. संस्थानाच्या प्रगतीला पोषक असे कायदे बनविण्याची निकड आठल्यांनी लावली व ते काम पुरे करून घेतले. प्रो. गज्जर यांच्याकडे बडोद्याचे 'कलाभवन' निर्माण करण्याचे काम सयाजीरावांनी सोपविले होते. परंतु त्यांना विद्वान सहकारी हवा होता. बापूसाहेब आठल्ये यांनी त्यांना सहाय्य दिले व या दोघांच्या प्रयत्नांतूनच बडोद्याचे 'कलाभवन' उभे राहिले.
सयाजीराव महाराजांचे अलोट प्रेम त्यांनीं संपादन केले. कर्तृत्ववान माणसांनी पारख करणाऱ्या या प्रगतिशील राजाने त्यांना नायब दिवाण म्हणून नेमले आणि त्यामधून अंतर्गत हेव्यादाव्यांना सुरुवात झाली. सयाजीराव परदेशी गेलेले असत व येथील कटकटी मिटविण्यात बापूसाहेबांचे सर्व श्रम खर्ची पडत. 'मी परत येईपर्यंत जाऊ नका,' या राजाज्ञेचा मान राखऱ्यासाठी, प्रकृती साफ ढासळली तरी आठल्ये बडोद्यातच राहिले. सयाजीराव महाराजांच्या सुधारणावादी धोरणाचा बोजवारा उडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या इंग्रजांच्या स्थानिक हस्तकांशी त्यांनी अखेरपर्यंत झुंज दिली. शरीर चालेना तेव्हा २० मार्च १८९४ रोजी ते मुंबईला परतण्यास निघाले. हातात काठी होती. 'गोविंदराव संभाळा इथं' असे ते रियासतकारांना म्हणाले व आठल्ये गाडीत बसले ते पुन्हा बडोद्याला न येण्यासाठी. मुंबईला मंडलिकांच्या घरी पेडर रोडवर त्यांना आणण्यात आले आणि २९ मार्चलाच रात्री ७।। वाजता वयाच्या फक्त ४३ व्या वर्षी त्यांचे देहावसान झाले. अलोट बुद्धिमत्तेच्या जोरावर सयाजीराव महाराजांच्या दरबारापासून ते मुंबई हायकोर्टाच्या न्यायमूर्तींच्या सभागृहात त्यांनीं आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. निःस्वार्थी वर्तन हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता. संस्कृत भाषेच्या गंगोत्रीतून समृद्ध संस्कृतीचा वारसा त्यांना लाभला व त्यांचे सबंध जीवनच कसे उजळून निघाले. या शिष्यवृत्तीच्या पहिल्या मानकऱ्याने आपला मान कर्तृत्वाने राखला व श्रेष्ठ परंपरेच्या रूपानें चिरंजीव करून ठेवला.

## बाळशास्त्री जांभेकर

पेशवाई गेली आणि देशात इंग्रजांची राजवट सुरू झाली. नवीन ज्ञान–विज्ञान आणि संस्कृती आली. अशा बिकट काळात समाजाला जागृत करणारा आणि मार्ग दाखवणारा एक बुद्धिमान पुरुष जन्माला आला. त्याचे नाव गंगाधरशास्त्री जांभेकर. आपले राज्य का गेले आणि इंग्रजांचे राज्य का आले, याचे अचूक निदान करणारा हा महाराष्ट्राचा पहिला पुरुष. इंग्रजांच्या ज्ञानाचा आणि विज्ञानाचा जनतेत प्रचार केला पाहिजे, त्याशिवाय जनता जागृत होणार नाही, ही राष्ट्रोद्धाराची विशाल दृष्टी या माणसाजवळ होती. लोककल्याणाच्या विविध कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे प्रचंड बौद्धिक सामर्थ्य त्यांना लाभलेले होते. बाळशास्त्री हा एक बुद्धीचा चमत्कारच होता. वयाच्या १२/१३ वर्षातच त्यांचे संस्कृत व मराठीचे अध्ययन पूर्ण झाले होते. नंतर ते मुंबईत आले. दोन–तीन वर्षांच्या आत पदवीधराला दिपवून टाकण्याइतके इंग्रजी ज्ञान त्यांनी मिळविले. शाळेत शिकत असतानाच तेथे ते गणिताचे प्राध्यापक झाले. सतराव्या वर्षी नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या नेटिव्ह सेक्रेटरीच्या जागेसाठी फर्ड्या इंग्रजीत अर्ज केला. तो अद्यापि उपलब्ध आहे. त्यात संस्कृत, इंग्रजी, मराठी, उच्च गणित, भूगोल, गुजराती, बंगाली आणि फार्शी हे विषय येत असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे त्यांना प्रथम डेप्युटी सेक्रेटरी आणि दोन वर्षांनी सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले.

इतक्या लहान वयात हा बहुमान त्या काळात मिळविणारे ते पहिले महाराष्ट्रीयन विद्वान होते. त्या वेळी ज्ञानाची साधने अत्यल्प होती. मुद्रणकलाही नुकतीच सुरू झाली होती. त्यावेळी पाठ्यपुस्तके तयार करून मराठी भाषेत त्यांनी रचली. ज्योतिषशास्त्र या विषयात त्यांचा अधिकार मोठा होता. 'शून्यलब्धि'वर मराठी भाषेत पुस्तक लिहिले. भारतीय शिलालेख, ताम्रपट यांचे संशोधन करून विद्वत्तापूर्ण निबंध लिहिले. इतिहास संशोधक. १०८ वर्षांपूर्वी शके १७६७ मध्ये ज्ञानेश्वरीची पहिली छापील पोथी पाठभेदासह संपादून बाळशास्त्री यांनी प्रसिद्ध केली. त्यांच्या अंगी अष्टपैलू विद्वत्ता होती. विविध विषयांवर त्यांनी ग्रंथ लिहिले. त्यांनी मराठी भाषेतील पहिले वर्तमानपत्र 'दर्पण' सुरू केले. हे वृत्तपत्र मराठी आणि इंग्रजीत निघत असे. म्हणून 'मराठी वृत्तपत्राचे जनक' ही पदवी त्यांना शोभत असे. त्या काळात इंग्रजीत केलेले हे वृत्तपत्रीय लेखन वाचून आजही बुद्धी थक्क होते. श्रीपती शेषाद्री याला शुद्ध करून धर्मात घेतले म्हणून त्या वेळी समाजाने त्यांचा खूप छळ केला. त्यानंतर ते लवकरच मरण पावले. आमच्या शापाने बाळशास्त्री मेले, असे ब्राह्मण फुशारकी मारत होते.

**– सुजाता सार्दळ**
ए विंग, ५०४, सन्मित्र शाळेसमोर,
गोगटेवाडी, गोरेगाव (पूर्व)
मुंबई – ४०००६३
मासिक – धर्मभास्कर ऑक्टोबर २०१५

*With Best Compliments from,*

REINDEER


**Reindeer Apparels**

for
jerkins and jackets

**Manini Gurjar**

1275, Shukrawar Peth,
Neha Apartments,
Subhash Nagar, L.No. 6,
Pune - 411 002

**Phone : 020-24476336, 24483225**
**Fax : 020-24454787**
E-mail : dispomed@vsnl.com



# कविता

डोळ्यांतून तुझ्या
वाहणारा पाऊस
बनवता मला हल्लख
मी राहतो रेंगाळत
तुझ्या अवतीभोवती असहाय्य
पाहत राहतो वाट
थांबवण्याची पाऊस
अन् मनावर तुझ्या
घालण्याची फुंकर
होऊन अगतिक हळूच

**– अल्पना कशाळकर**




संस्थापक
कै. वासूदेव महादेव जावडेकर

# सातारी पेढा शॉप

स्थापना-१९३६

**मशहूर**

सातारी पेढे
काजू बर्फी
आंबा बर्फी
गुलकंद बर्फी
श्रीखंड वडी



**चटकदार**

फरसाण
स्पेशल चिवडा
सुकामेवा
खारा काजू
चटणी वगैरे

श्रीखंड आणि चक्का

**पौष्टीक खाद्य भांडार**

अभ्यंकर रोड, सीताबर्डी, नागपूर–440012, फोन : 0712–2525704

## संस्थावृत्त

### कऱ्हाडे ब्राह्मण बेळगांव संघाची पावसाळी सहल

आमच्या संघाची पावसाळी सहल काढायचे ठरले. सहल दिनांक २२ व २३ रोजी सुरल फॉल्स, मांगेली फॉल्स, तिलारी धरण येथे जाऊन आली. सहल जाणार आहे हे ठरल्यावर व्हॉट्स-ॲपच्या ग्रुपवर मेसेज टाकला सगळ्यांना. हळूहळू सगळी गँग तयार झाली. आमचा ग्रुप जमला. नेहमीप्रमाणे सकाळी सात वाजता प्रवासाला सुरुवात झाली.

गाडी खानापूरला पोहोचली तिथे गाडीची पूजा करून गाडी जांबोटी सुरल फॉल्सकडे रवाना झाली. थोड्याच वेळात चॉकलेट्स, खाद्यपदार्थ बाहेर पडू लागले. या सहलीत सकाळी काही जणांची ओळख नव्याने झाली. त्यात श्री व सौ. अलुरकर हे दाम्पत्यही होते. पण थोड्याच वेळात ते आमच्यातीलच एक होऊन गेले. आता तर अलुरकर वहिनी व्हॉट्स-ॲप ग्रुपलाही जोडल्या गेल्या आहेत.

या सहलीचे वैशिष्ट्य असे ही की यात सर्वच जण आपली जबाबदारी ओळखून काम करत होते. चहा, नाश्ता, जेवण याचे वेळेवर नियोजन फारच छान होते. आमच्या पत्रकात लिहिल्याप्रमाणे आम्हाला कोठेही जास्त चालावे लागले नाही. सुरल फॉल्स तर छानच होता.

मांगेली फॉल्सचा तो मस्त अनुभव, घाटातला रस्ता, रस्त्यातला तो पाऊस आणि या सगळ्यात जीपचा प्रवास, फॉल्सचे ते पाण्याचे तुषार हा खरच खूप छान अनुभव होता.

रात्री मुक्कामाच्या ठिकाणी म्हणजे केरी येथे विजयादुर्गा मंदिरात पोहोचलो. बरोबर ८.३०ला आरती झाली. मग चार चारचा ग्रुप करून रूमच्या चाव्या



घेतल्या. फ्रेश होऊन गरमागरम जेवण केले. मग सहाजिकच आमचा कंपू म्हणजे मैत्रिणी गप्पा मारत बसलो. या सहलीच्या निमित्ताने आम्हाला खूप दिवसांनी गप्पा मारायला मिळाल्या.

सकाळी आवरून देवीचे दर्शन घेतले व मस्त फेरफटका मारला. त्यानंतर कुंकळी येथील बालाजी देवस्थान व तिलारी धरण पाहून भटवाडी येथील मणेरीकरांकडे गेलो. इतका छान गर्द हिरवा परिसर आहे तो खूपच आवडला. त्यांच्याकडे जेवणाची व्यवस्था केली होती. केळीच्या पानावर सुग्रास भोजन. अतिशय अगत्य होते मणेरीकरांकडे. त्यांचे विशेष आभार मानते. त्यानंतर आम्ही नदी पाहायला गेलो. तेथे मुलंच नाही तर माझ्या काही भगिनींनीही पाण्यात खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला.

५.३० वा परतीचा प्रवास सुरु झाला. प्रवासात गप्प न बसता दंगा करायचा, हे व्रतच घेतल्यामुळे गाडीतील सर्व महिलांना हळूहळू गाण्यासाठी बोलावून एकत्र केले. चेक पोस्ट आल्यावर आमची रामरक्षा सुरू होती. पोलीस चेकिंग करणार होता. जोरजोरात रामरक्षा म्हणत असलेले बघून तो गाडीतही चढू शकला नाही. त्यालाही पळवून लावले. अर्थात या सगळ्या गोष्टींसाठी आम्हाला पुरुष वर्गाची ही साथ लाभली. रोजच्या कामामधून दंगा घालायला कुठे मिळतो? आमच्याबरोबर त्यांनीही मज्जा लुटली.

अर्थातच याचे श्रेय आपले अध्यक्ष श्री. शिरीष कानेटकरांना देते. सगळ्यांना एकत्रित करून प्रत्येकाला काय हवे नको ते त्यांनी उत्तमपणे सांभाळले. सगळ्यांच्या वतीने मी त्यांचे जाहीर आभार मानते. वर्षानुवर्षे अशाच सहली निघाव्यात व अनेकांनी त्यात सहभागी व्हावे, अशी इच्छा व्यक्त करून मी माझे मनोगत संपवते.

**– सौ. मधुगंधा अंबिलकर**

### सुवचनामृत

संकलन : सौ. अपर्णा भा. काजरेकर,
मोबा : ९९८७०७७४६०

आपण केलेला प्रत्येक विचार, आपण केलेली प्रत्येक क्रिया काही काळाने सूक्ष्म रूप धारण करते, जणू बीजरूप धारण करते आणि अव्यक्त रूपाने सूक्ष्म शरीरात राहते आणि कालांतराने फिरून प्रकट होऊन अनुरूप फल देते. या फलांनी माणसाचे जीवन नियंत्रित होत असते.



**– स्वामी विवेकानंद**

आपले मन असे चमत्कारिक आहे की, त्याला वाईट विचार करण्याची खोड असते. ही खोड जाण्याकरिता माणसाने जास्तीत जास्त चांगले विचार करावेत.

सुविचारांत फार मोठी शक्ती असते.

सुविचाररूपी घोड्यावर आपण स्वार झालो म्हणजे नरकाचादेखील आपणाला स्वर्ग करता येतो. त्याच्या कुविचाररूपी घोड्यावर आपण स्वार झालो म्हणजे स्वर्गाचादेखील नरक होतो.

कुविचारामुळे चिंता निर्माण होते व सुविचाराने ती निघून जाते. म्हणजेच सुविचारांचा प्रकाश पडला म्हणजे अंधकार नाहीसा होतो, याची प्रचिती येते.

**– न्या. राम केशव रानडे**

# आठवणीतील गाणी



## गेले ते दिन गेले

**गीत –** भवानी शंकर पंडित
**संगीत –** श्रीनिवास खळे
**स्वर –** हृदयनाथ मंगेशकर

वेगवेगळी फुले उमलली, रचुनि त्यांचे झेले
एकमेकांवरी उधळले, गेले ते दिन गेले

कदंबतरुला बांधून दोला, उंच खालती झोले
परस्परांनी दिले– घेतले, गेले ते दिन गेले

हरित बिलोरी वेलबुटीवरी, शीतरसांचे प्याले
अन्योन्यांनी किती झोकले, गेले ते दिन गेले

निर्मल भावे नव देखावे, भरुनी दोन्ही डोळे
तू मी मिळुनी रोज पाहिले, गेले ते दिन गेले

## लाजून हासणे अन्...



**गीत –** मंगेश पाडगावकर
**संगीत –** श्रीनिवास खळे
**स्वर –** हृदयनाथ मंगेशकर
**राग –** पहाडी

लाजून हासणे अन् हासून ते पहाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे
डोळ्यास पापण्यांचा का सांग भार व्हावा?
मिटताच पापण्या अन् का चंद्रही दिसावा?
हे प्रश्न जीवघेणे हरती जिथे शहाणे ।।मी ओळखून...।।
हाती धनुष्य ज्याच्या त्याला कसे कळावे?
हृदयात बाण ज्याच्या त्यालाच दुःख ठावे
तिरपा कटाक्ष भोळा, आम्ही इथे दिवाणे ।।मी ओळखून...।।
जाता समोरुनी तू उगवे टपोर तारा
देशातुनी फुलांच्या आणी सुगंध वारा
रात्रीस चांदण्यांचे सुचते सुरेल गाणे
मी ओळखून आहे सारे तुझे बहाणे
लाजून हासणे अन् हासून ते पहाणे

# चातुर्वर्ण्य...

आपल्या प्राचीन भारताने जगाला अनेक क्षेत्रात उपयोगी देणग्या बहाल केल्या आहेत.

मानवी समाजाचे जीवन स्वास्थ्यपूर्ण असावे व त्याने प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधावी, या शुभहेतूने या विषयावर सखोल चिंतन करून आपल्या प्राचीन ऋषी–मुनींनी चातुर्वर्णाची व्यवस्था गुण–कर्म विभागाप्रमाणे केली.

कोणत्याही कामाचा व्याप वाढला की, व्यवस्था ही करावीच लागते. त्याला नाव काहीही द्या. चातुर्वर्ण्य म्हणा किंवा चार वर्ग म्हणा– ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र.

आजही जगाची प्रगती याच मूलभूत तत्त्वाला धरूनच चालली आहे.

मानवी जीवनाच्या स्वास्थ्याची विज्ञानाचा आधार घेऊन प्रगती करण्यात आपणच अग्रेसर आहोत, असा दावा करणाऱ्या अमेरिकेतील ही एक घटना आहे.

सुमारे १०० वर्षांपूर्वी अमेरिकेतील समाज हितचिंतकांचा एक मेळावा– संमेलन भरले होते. त्यात एका प्रबंधाचे वाचन करण्यांत आले. त्या प्रबंधाचा मथितार्थ थोडक्यात **पुढीलप्रमाणे होता–**

समाजस्वास्थ्य व समाजाची प्रगती यावर सखोल चिंतन केल्यानंतर त्यातून पुढील निष्कर्ष काढण्यात आला आहे. भारतामध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्वात होती. व्यक्तींमध्ये असलेल्या विशिष्ट कौशल्यावर आधारित वर म्हटलेले चतुर्वर्ण्य होते. ब्राह्मण– समाजाला ज्ञानदान करीत. क्षत्रिय– समाजाचे अनिष्ट तत्त्वांपासून संरक्षण करीत. वैश्य– समाजाला उपयोगी अशा वापरण्यायोग्य वस्तू उपलब्ध करून देत व शूद्र सर्व वर्गांची सेवा करीत असत.

मूलतः ही वर्णव्यवस्था समाजाच्या विविध गरजा भागविण्यासाठीचे Division of Labour होते. तसेच मूलतः ही व्यवस्था आनुवंशिक नव्हती, तर ती वर म्हटल्याप्रमाणे व्यक्तिगत कौशल्यावर आधारलेली होती. म्हणजेच (हल्लीप्रमाणे) ब्राह्मणांचा वंशज वृत्तीने वैश्य असला तर तो व्यापार क्षेत्र सांभाळत असे. ती योजना फारच अनुकूल आहे. भारताने तिचे संवर्धन करावे व जगातील सर्व राष्ट्रांनीही त्याचा अवलंब करावा.

नंतर पुढे या योजनेचे काय झाले समजले नाही. चंद्र आणि मंगळ यांच्यावरील स्वाऱ्यांना येथील विज्ञानवाद्यांनी जास्त महत्त्व दिले असेल व यामुळे या योजनेचा विचार बाजूला सारला गेला असल्याची शक्यता आहे.

हे एक कटू सत्य आहे की अशा योजनेद्वारा भारताने सुवर्णयुग पाहिले. त्याचप्रमाणे या योजनेत काही दोष निर्माण झाल्यामुळे आणि परकीयांच्या सतत होणाऱ्या आक्रमणामुळे भारताची सर्व क्षेत्रांतील प्रगती मंदावली. देशात परतंत्रता आली.

कारणे काहीही असली तरी दोष त्या योजनेला देता येत नाही. एकविसाव्या शतकाची वाटचाल चालू असताना हा विषय या वेळेला अप्रस्तुत आहे. अशा प्रकारचे विचार प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. परंतु ऐतिसासिक स्थित्यंतराच्या वेळी मानवी समाजाला वास्तविकतेचे भान करून देणे आवश्यक आहे, असे मला वाटते.

या सुंदर, सदुपयोगी योजनेचे मर्म आपल्या जातिबांधवांच्या दृष्टिक्षेपात असावे, या सदिच्छेच्या भावनेमुळे हा खटाटोप केला आहे.

**– दिगंबर प्रभुदेसाई**

# नर्मदा परिक्रमा व नर्मदा माहात्म्य

सर्व नद्या पवित्र आहेतच, परंतु ज्या प्रत्यक्ष समुद्राला जाऊन मिळतात, त्या अधिक श्रेष्ठ मानल्या जातात. अशा श्रेष्ठ नद्या म्हणजे गंगा, यमुना, सरस्वती व नर्मदा या सर्वश्रेष्ठ मानल्या जातात. गंगा ऋग्वेदरूपी, तर यमुना यजुर्वेदस्वरूपी, सरस्वती ही अथर्ववेदस्वरूपी आणि नर्मदा सामवेदस्वरूपी मानल्या जातात. अशा प्रकारे आपल्या योग्यतेने नर्मदेने प्रथम दर्जा प्राप्त केला होताच, परंतु प्रथम दर्जातही प्रथम स्थानही मिळावे आणि हे स्थान ब्रह्मदेवच देऊ शकतात, म्हणून नर्मदेने घोर तपश्चर्या करून ब्रह्मदेवांना प्रसन्न करून घेतले. परंतु ज्या वेळी आपले इप्सित सांगितले, त्यावेळी ब्रह्मदेवांनी काही प्रश्न विचारले, तेव्हा ती निरुत्तर झाली. आपले इप्सित साध्य झाले नाही, असे पाहून ज्याच्या हृदयात दया, आपलेपण, निजत्व आहे, अशा पित्यास– श्रीशंकरास– शरण जाण्याचे ठरवून काशीस गेली. तेथे आपल्या नावाने 'नर्मदेश्वराची' प्रतिष्ठापना करून आराधना केली. अर्थात श्रीशंकरजी प्रसन्न झाले आणि प्रकट होऊन वर माग, असे म्हणाले, तेव्हा प्रथमच जर आपण आपले इप्सित सागितले, तर ब्रह्मदेवांनी आपली जी गत केली तशी झाली तर मग आपण कुठे जाणार? तेंव्हा प्रथम निष्कामता दाखवून आपले इप्सित सांगावे आणि साध्य करावे, या हेतूने ती श्री शंकरास म्हणाली, हे प्रभो, आपण प्रसन्न झालाच आहात, अशीच कृपा राहावी असा वर मला द्यावा. श्री शंकरजी स्वता:शीच म्हणाले, ''आपण असुर, राक्षसांनासुद्धा मागतील तो वर देतो आणि ही तर आपली मुलगी निरिच्छ मनानं फक्त आपल्या पायाशी भक्ती मागते.'' श्री शंकरजी नर्मदेस म्हणाले, ''तू जी इच्छा प्रकट केली ती तर पूर्ण होईलच, पण त्याशिवाय आणखी दोन वर मी तुला देतो. पहिला वर तुझ्या दोन्ही तीरावर जितके पाषाण असतील, ते सर्व शिवलिंगस्वरूप समजले



जातील. दुसरा वर मी असा देतो की, गंगा, यमुना आणि सरस्वती यामध्ये तू सर्वश्रेष्ठ समजली जाशील, नर्मदेला हेच हवे होते.

ही गोष्ट पक्की करून घेण्यासाठी नर्मदेने पुन्हा विचारले, ''हे कसे मानले जाईल?'' यावर शंकरजी म्हणाले की, ''गंगेमध्ये स्नान केल्याने, यमुनेकाठी सात दिवस राहून स्नान, पूजन, अर्चना केल्याने आणि सरस्वती काठी तीन दिवस राहिल्याने मनुष्यप्राणी पापमुक्त होतो; परंतु तुझ्या नुसत्या दर्शनाने मनुष्य पापमुक्त होईल.'' याबरोबरच तुला आणखी एक वर देतो की, ''काशीमध्ये तू स्थापित केलेल्या 'नर्मदेश्वराचे' जो दर्शन घेईल, तो पापमुक्त होईल.'' न मागता आपल्या मनातील वर मिळाल्यामुळे नर्मदा प्रसन्न होऊन आपल्या स्वस्थानी विंध्याचलात परत आली. इतर नद्यांपेक्षा नर्मदेत आणखीही कांही विशेषता आहेत, त्या खालीलप्रमाणे–

१. उगमापासून समुद्रमिलनापर्यंत नर्मदा डोंगरदऱ्यामधून वाहते.

२. सर्व नद्या उत्तरेकडून पूर्वेकडे वाहतात, पण नर्मदा पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते.

३. जितकी तीर्थे नर्मदेच्या किनारी आहेत, तितकी तीर्थे इतर कोणत्याही नदीच्या तीरावर नाहीत. तिच्यातील दगडन्‌दगड शंकर मानला जातो.

४. नर्मदेवर बांधलेले पक्के घाट आणि तिच्या भोवतालची वनश्री इतर कोणत्याही नदीवर नाही.

५. कोणत्याही नदीचा जयजयकार करताना तिच्या वडिलांचे नाव घेतले जात नाही, परंतु नर्मदेचा जयजयकार नर्मदेऽहर असा केला जातो.

६. अनादी कालापासून नर्मदेची विधिवत प्रदक्षिणा केली जाते तशी अन्य कोणाचीही केली जात नाही.

७. नर्मदाकिनारी येऊन ब्रह्मा, विष्णू, महेश, लोकपाल देवता, यक्ष, गंधर्व, अप्सरा आदींनी तपस्या करून सिद्धी प्राप्त करून घेतली आहे. म्हणूनच म्हटले आहे की 'रेवातीरेत: कुर्यात मरणं जान्हवी तटे' नर्मदा हा संस्कृत शब्द आहे त्याचा अर्थ असा नर्म=सुख, दा=दायिनी, अशी ही सुखदायिनी नर्मदा.

पृथ्वी गोलावर धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त असलेला सर्वांत मोठा देश जर कोणता असेल, तर तो भारत देश होय! भारताला ३ बाजूंनी पाणी, तर उत्तरेला हिमालय पर्वत असे नैसर्गिक संरक्षण मिळाले आहे. हिमालय हा सर्वांत मोठा पर्वत, तर सह्याद्री, विंध्याचल, सातपुडा असे अनेक महत्त्वपूर्ण पर्वत आहेत. या पर्वतांमधून अनेक नद्यांचा उगम झालेला असून, पुढे त्या समुद्राला मिळाल्या आहेत. नर्मदा ही एकच अशी पवित्र नदी आहे की, ती पूर्वेला विंध्याचल पर्वतामधील अमरकंटक येथे उगम पावली असून,

पश्चिमेला अरबी समुद्राला मिळाली आहे. म्हणूनच तिला अनन्यसाधारण महत्त्व आहे. याचे कारण हेच की नर्मदा नदीची अमरकंटकपासून प्रवाहित लांबी १७८० मैल म्हणजे अंदाजे ३६०० कि.मी. एवढी दोन्ही तटांच्या बाजूने होणारी परिक्रमा आहे. आजूबाजूचा निसर्गरम्य हिरवागार परिसर पाहत, ईश्वराचे नामस्मरण करत किती दिवसांत करायची त्याला शास्त्रीय आधार आहे. अधिकाधिक वेळ जप-ताप, अनुष्ठाने यामध्ये व्यतीत करून सिद्धी प्राप्त करणे, हा हेतू ठेवून परिक्रमा करताना दिवसातील किती तास, किती कि.मी. किती रात्री तीर्थक्षेत्रावर व्यतीत करावयाचा, या हेतूने पायी परिक्रमेस ३ वर्षे ३ महिने १३ दिवस एवढा अवधी निश्चित केला आहे. कारण शास्त्रानुसार चातुर्मासामध्ये साधक परिक्रमावासी जिथे असेल तेथेच त्याने वास्तव्य करावे, असे संकेत आहेत.

'यानिकानिच पापनि जन्मांतर कृतानिच।

तानि तानि प्रणश्यन्तु प्रदक्षिणा पदे पदे'

मनुष्याने जन्मजन्मांतरात केलेली पापे त्याच्या निवारणार्थ किंवा केलेल्या पापांची निवृत्ती प्राप्त करण्यासाठी एखाद्या पवित्र स्थळी प्रदक्षिणा केली जाते. त्यामुळेच पापहरण होते म्हणूनच परिक्रमा करावी, असे संकेत आहेत.

जी नदी पूर्वेकडून उगमित होऊन पश्चिमेस प्रवाहित होऊन सागराला मिळते, अशा नदीला म्हणजेच नर्मदेला परिक्रमा करण्याचा प्रघात आहे. कारण नदी पश्चिमाभिमुख असल्याने तिचे डावे अंग हे दक्षिणेकडे व उजवे अंग उत्तरेकडे असल्याने परिक्रमा करणाऱ्याने नर्मदा नदी ही नेहमी उजव्या बाजूस असावी, अशा प्रकारे परिक्रमा करावी. यास मुंडमाल प्रदक्षिणा/ परिक्रमा असे म्हणतात. म्हणजेच मस्तकावरून आलेल्या माळेनुसार प्रथम सर्व प्रमुख स्थाने ठरवून त्याच्या दोन्ही बाजूने प्रदक्षिणा करतात. दुसरा प्रकार म्हणजे जललहरी परिक्रमा म्हणजे जललहरींच्या बाहेरील तटावरून दोन वेळा प्रदक्षिणा केली जाते. तिसरा प्रकार म्हणजे हनुमान परिक्रमा या परिक्रमेमध्ये दोन्ही तटावरून उड्डाण करून प्रदक्षिणा पूर्ण केली जाते.

हे तीन परिक्रमेचे प्रकार असले तरी बहुतेक जण मुंडमाल परिक्रमा म्हणजे नर्मदा नदीस उजव्या अंगास ठेवून परिक्रमा करतात. या प्रकारातील परिक्रमेत पुन्हा २ प्रकार आहेत. एक म्हणजे पायी परिक्रमा आणि दुसरी म्हणजे बसने. कालमानानुसार ज्याला जमेल तशी त्या परिक्रमावासीने परिक्रमा पूर्ण करावी. साधारणतः बहुतेक जण ओंकारेश्वरचे पूजन करून येथून परिक्रमेचा संकल्प सोडून परिक्रमा सुरू करतात.

पुढील भागामध्ये आपण प्रत्यक्ष परिक्रमेची माहिती घेऊ.

**– सौ. शुभदा गुर्जर, पुणे**

भ्रमणध्वनी : ८३९०२९००४५


# फणसळकर कोंकण काजू



कोकण काजू सांडगी मिरची

फणस-तळलेले गरे काजूकतली

उत्पादक :

**प्रा. सौ. मृणालिनी विजय फणसळकर**


मु. पो. – आंगले, ता. राजापूर, जि. रत्नागिरी

फोन. : ९४२२२९६५५३, ०२३५३-६५६२५१


## या पुन्हा या



या गदिमा, या बाबूजी, या पुन्हा या
नवी गीते, नव्या चाली, घेउनी या
शब्द नी स्वर प्रभूंच्या संगमात
रसिक चिंब भिजोनी जाऊ द्यात
झडू द्या पुन्हा एकदा द्वयींच्या
मैफली गाण्याच्या अन् चालींच्या
जाऊ द्या रसिकांची मने भारुनी
डोलू द्या रसिकांच्या मना ऐकुनी
होऊ द्या तृप्त कान शब्द – सुरांनी
सुरू करू या राग भूप-भूपाळी
साजरी होईल रोजच दिवाळी
गाऊ या रस शृंगार गंभीर वीर
गाउनी राग यमन, शंकर, केदार
ऐकू या भक्ती, करुण, विरह रस
आळवुनी मालकंस भिमपलास
शब्द, सूर, लय तालांच्या साथींनी
भारावतील रसिक मनातुनी
गातील आपली रसिक थोरवी
वाचुनी, ऐकुनी, अखेरी भैरवी



**– श्रीहरी गुणे**

# राष्ट्रशाहीर म. ना. नानिवडेकर (१९०४–६२)

## व्यक्तिपरिचय

माझे वडील शाहीर महादेव नारायण नानिवडेकर यांचा जन्म १९०४ मध्ये किसरूळ, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे झाला. त्या काळी भाजारभोगावपासून ६ कि.मी. पायी जावे लागे. आता एस.टी. सुरू झाली आहे.

१९२३ साली मॅट्रिक झाल्यावर प्रथम नकला करत असत. ज्या समाजातील विविध व्यक्तींच्या असत कीर्तनकार, भटजी वगैरे.



१९२८ साली मुंबईला ब्राह्मण सभेत खाडिलकरांचा पोवाडा आणि नानिवडेकरांच्या नकला असा कार्यक्रम होता. तिथे अनेकांनी त्यांना तुमचा आवाज पोवाड्यासाठी जास्त चांगला आहे तेव्हा तुम्ही शाहीर व्हा, असे सांगितले. प्रथम झाशीच्या राणीचा पोवाडा स्वतः रचला ज्याच्या HMV कंपनीने ३ रेकॉर्ड्स काढल्या. नंतर शिवाजी महाराज, टिळक, म. गांधी अशा मोठ्या व्यक्तींवरदेखील पोवाडे रचले. त्यांच्या पोवाड्याचे पहिले कडवे खूप जोरदार असे. उदा. पू. आहिल्याबाई होळकर यांच्यावरील पोवाडा धन्य राणी अहिल्या होळकर। राज्य धुरंधर । पुण्याशील थोर । स्वधर्मोद्धार जिने हो केला। आसेतू हिमाचला वरी क्षेत्र मंदिरी देवत परी जिचा बोलबाला।। या सगळ्याच्या HMV कंपनीने ७८ RPM च्या रेकॉर्ड्स काढल्या होत्या. काही पोवाडे www.powada.com/lyries/mahadev nanivadekar/index.htm येथे उपलब्ध आहेत. कोल्हापूरमधील कोष्टी गल्लीतील त्यांच्या स्वतःच्या घरात प्रॅक्टिस चालत असे. गणेशोत्सवात दहाही दिवस त्यांचे कार्यक्रम साखर कारखाने/पुणे–मुंबई अशा ठिकाणी होत असत. ते आकाशवाणी कलाकार होते.

ते एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. चित्रकलेत त्यांना चांगली गती होती. दोन्ही हातांनी ते चित्र काढत. तसेच चांगल्यापैकी वक्तेही होते. कोणत्याही विषयावर अर्धा तास सहज बोलत. तसेच लाठी–दांडपट्टा या पारंपरिक खेळात चांगलेच प्रावीण्य मिळवले होते. हातात जर लाठी असेल तर ५–६ जणांपासून संरक्षण कसे करावे, याचे प्रात्यक्षिक देत असत. महिलांनादेखील या कलेचे प्रशिक्षण ते देत असत. याखेरीज ते चांगले नटदेखील होते. नेताजी पालकर या भालजींच्या चित्रपटात विनोदी भूमिका बजावली होती व एक लावणीदेखील गायली होती. रंगभूमीवरदेखील त्यांनी नट, दिग्दर्शक म्हणून काम केले होते. गदिमांच्या 'युद्धाच्या सावल्या' हे नाटक त्यांनी स्वतः बसवून कामदेखील केले होते व भावगीत गायक दत्ता वाळवेकर यांनादेखील सामील केले होते.

पोहण्यामध्ये देखील ते तरबेज होते. निरनिराळ्या प्रकारच्या उड्या ही त्यांची खासियत होती. तसेच ते प्रशिक्षक म्हणूनदेखील काम करत असत. शाळेचे शिक्षक म्हणूनही त्यांनी काही काळ नोकरी केली.

ढोलकी वाजवण्यातही ते प्रवीण होते. १९३३ साली बंगाली नर्तकी मीरादेवी यांच्या ग्रुपमधून इंग्लंडला जाऊन दांडपट्ट्याची फेकचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच सिलोनी नर्तक दाम्पत्य सूर्यसेन व नूतनदेवी यांच्या ग्रुपमधून परदेशात जाऊन विलायतेत सर्वोत्कृष्ट तलवारबहादूर असा गौरव मिळवला होता. यांच्या २५ व्या पुण्यतिथीला 'नरसिंह' या नावाने स्मृती विशेषांक काढण्यात आला होता. ज्याचे संपादक श्री. बिंदुमाधव जोशी होते. कार्यकारी संपादक रामचंद्र देखणे आणि सहाय्यक संपादक ज्ञानेश्वर जाधव होते.

अश्या या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाला शतशः प्रणाम!

**– रा. म. नानिवडेकर**
१, जयंती सोसायटी,
टिळकवाडी, नासिक ४२२००२
मोबा : ९४२१७०५८६४

## स्वर्गस्थ पत्नीस

उदंड आयुष्य पतीला दे देवा
अखंड प्रार्थिले माझ्यासाठी तुवा
ऐकून तुझी ती उत्कट मागणी
दीर्घायुष्य मला दिधले देवांनी
परी पत्नीसाठी कोणाही पतीने
प्रार्थिलेले न देवा व्रत वैकल्याने
परंतु जेव्हा मी प्रार्थिले शेवटी
नाहीच ऐकली देवाने हाक ती
माझेच संचित दुबळे वंचित
तुझीच पुण्याई प्रभावी खचित
सौभाग्यमंडित गेलीस स्वर्गात
तुझे ग जीवित सफल कृतार्थ
तुझिया वाणीत प्रीतीचे स्पंदन
तुझिया कृतीत सेवेचे चंदन
तुझिया संगती सुखाचा संसार
तुझिया कुशीत वंशाचा विस्तार
तुझिया नावात उबेचे मांगल्य
तुझिया रूपात संध्येचे लावण्य
संध्या ती सरली अनंती विरली
माझिया जीवनी रजनी उरली

**प्रेषक : गं. वि. ठेकेदार**
**द्वारा किशोर गं. ठेकेदार**
**मोबा : ९३७३५९७४७६**

# प्राचीनतम सनातन धर्म

जगातील एकमेव प्राचीनतम धर्म सनातन धर्म. या धर्माच्या छत्रछायेखाली व त्याच्याच आधाराने प्राचीन भारतातील ऋषी-मुनींनी नैसर्गिक वातावरणाचा सूक्ष्म अभ्यास करून मानवाला व मानवसमाजाला अनुरूप सौख्य देणाऱ्या योजना आखल्या व जगापुढे ठेवल्या. त्यातील एक 'चातुर्वर्ण्य'. जगातील मोठमोठ्या विद्वानांनाही ही योजना म्हणजे जणू काय 'चक्रव्यूहच' भासतो. परंतु सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या समाज चिंतकांना त्यातील मर्म समजते. अशा समजूतदार अमेरिकन चिंतकांनी सुमारे १०० वर्षांपूर्वी एक संमेलन भरवून त्यात या योजनेचे गुणगान केले होते. व ही योजना-व्यवस्था भारताने जोपासावी व कदाचित त्यांना ते शक्य न झाल्यास आपणाला जगातील मानवसमाजाच्या हितासाठी ती येथे निर्माण करावी लागेल, अशा प्रकारचा एक प्रस्ताव त्या संमेलनात पास करविला होता. तशीच दुसरी एक व्यवस्था-योजना साधी सरळ वाटणारी जगासमोर ठेवली. ती म्हणजे लहानपणापासून माणसांना समजावा, की जी गोष्ट अगर वस्तू आपली नाही. तिची आपण इच्छा करावयाची नाही आणि जी गोष्ट अगर वस्तू आपणाला पाहिजे असेल, ती आपण मेहनत करून मिळवायची. एवढे तुम्ही करू शकाल तर जगातील अशांती आणि उपद्रव समग्र दूर होऊ शकेल. भारताने हे घडवून दाखवले आहे. गेल्या पिढीपर्यंत भारतातील खेड्यापाड्यातील लोकांना आपल्या घरांना कुलपे लावण्याची गरज भासत नव्हती. भारतात अशा प्रकारचे राजे होऊन गेले आहेत की ते वर्षातून एक दिवशी आपली सर्व संपत्ती गरजू लोकांना वाटून टाकीत असत व आपल्या परिवाराला मातीच्या भांड्यात स्वयंपाक करावयाला सांगत असत व यांचा परिवारही त्या गोष्टींत गौरव मानत असे. दान घेणारे त्या वेळी कोणी मिळत नसत. त्यांना शोधून काढावे लागत असे. अन्नछत्रे उघडली जात असत, पण त्यामध्ये आपण त्याचा लाभ शक्यतो घेऊ नये, असा व्यवहार असे. ही योजना जगासमोर ठेवून भारताने जणू आव्हान दिले, की ते स्वीकारा. भारतामध्ये म्हणे मंत्राने अग्नी प्रगट केला जात असे. भारतात अशा छोट्या छोट्या सद्विचारांच्या समूहाने घर्षण घडू न देता जणू अग्नी प्रगट होत होता. त्याच्या ज्वाळा उंच आकाशात पसरत होत्या.



त्यातून धुराचे वलयही निर्माण होत असे. जगातील लोकांना फक्त हा सोन्याचा धूर दिसत असे. परंतु कोठून येतो हे एक कोडे होते. कारण निसर्गाने भारताच्या उत्तर दिशेला हिमालयीन पर्वतरांगा उभारल्या होत्या. दक्षिणेला पश्चिम-पूर्व अशा समुद्राचा जागता पहारा गर्जत होता. नंतर जणू काय सर्व जगाने एकमत करून या कोड्याचा उलगडा करावयाचे ठरविले. त्यांनी हिमालयीन पर्वतराजीवर निरीक्षण करून काही खिंडी शोधून काढल्या. त्या खिंडीद्वारे त्यांनी पलीकडील प्रदेशात प्रवेश करावयाचे ठरविले; परंतु त्या खिंडीमधील स्थानिक रहिवासी टोळ्यांनी त्यांना पिटाळून लावले. खुष्कीचा जमिनीवरचा मार्ग जरा धोक्याचा वाटल्यावरून काही राष्ट्रांनी दुसऱ्या दिशेने जलमार्गाचा विचार केला. भारतातील त्यावेळच्या लोकांना खोटे बोलणे, असत्ये बोलणे जणू माहीतच नव्हते. त्यांनी बाहेरून येणाऱ्या लोकांना आपल्यावरूनच, आपल्यासारखे समजून त्यांचे नुसते स्वागतच नव्हे, तर आपल्या परंपरेप्रमाणे 'अतिथी देवो भव' या भावनेने त्यांचे स्वागत केले. त्यांच्या या वृत्तीचा पुरेपूर फायदा घेऊन विदेशी आक्रमणकारांनी येथील स्थानिक लोकांचा कसा छळ केला, याची साक्ष इतिहास देऊ शकतो. जगाच्या दृष्टीने येथील स्थानिक लोकांच्या त्या चुकीची फळे आजच्या पिढीलाही भोगावी लागत आहेत. आता या २१व्या शतकाच्या पिढीतील भारतीय जनतेने जगासमोर जणू काय 'शिवधनुष्य' ठेवले आहे. त्याला उचलून दोरी लावण्याचे राहू द्या, पण फक्त उचलून दाखवावे. जणू काय जगातिल ऑलिम्पिक सामन्यामध्ये हे आव्हान ठेवले आहे. कुठले प्रगतीकारक राष्ट्र हे आव्हान स्वीकारून मानवी समाजाच्या सुखात भर घालण्याचे श्रेय घेत आहे, याचे जणू काय भारत हिमालयाच्या स्थिर वृत्तीने पाहणी करणार आहे. जगाच्या सुरुवातीला भारताने जो इतिहास घडविला होता तो आता जणू काय अंतसमय जवळ येऊ लागला असल्याचा भास होत असताना कुठले राष्ट्र त्या इतिहासाची पुनरावृत्ती घडवू शकेल, त्याची जग आणि इतिहासही आतुरतेने वाट पाहत आहे. त्याचीही साक्ष इतिहासच - समयच देईल. म्हणूनच 'कालाय तस्मै: नम:'

**लेखक : दिगंबर मल्हार प्रभुदेसाई,**
किंजवडेकर द्वारा सौ. हेमांगी हिमांशु बापट, सिल्वर - १,
सहनिवास आकुर्ली तिठा क्र. १,
कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१
दूरध्वनी : ०२२ - २८८६१९१९
भ्र. ध्वनि : ९८७०५८८९६३

# स्वा.सै. वसंतराव बोंद्रे- गुर्जर यांचा ९ ऑगस्ट रोजी सत्कार संपन्न

स्वातंत्र्यसैनिक आणि शतायुषी वसंतराव वासुदेव बोंद्रे-गुर्जर यांचा क्रांतिदिनी म्हणजेच दि. ९ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार संपन्न झाला. दि. ९ ऑगस्ट हा बोंद्रे-गुर्जर यांचा वाढदिवस असून, यंदाचा त्यांचा शंभरावा वाढदिवस दिल्लीत राष्ट्रपती भवनात संपन्न झाला.

१९३० मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी बोंद्रे-गुर्जर यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. शाळेत असतानाच महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी उडी घेतली. इंग्रजी शाळेवर बहिष्कार घातला. मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. शिरोडा येथील मिठागरातून आणलेले मीठ इंग्रज सरकाने बेकायदा ठरविले. ते विकण्याचे काँग्रेसने ठरविले. वसंतराव व अन्य सेवकांनी ते विकण्यास सुरुवात केली. त्यामुळे वसंतरावांसह स्वयंसेवकांना पकडण्यात आले. त्यांना एक महिन्याची शिक्षा झाली.

पुढे म. गांधींनी दारूबंदी सत्याग्रह सुरू केला. पिकेटिंग करताना वसंतराव पुन्हा पकडले गेले आणि पंधरा दिवस तुरुंगवास घडला. १९३० मध्ये सुरू केलेल्या खानेसुमारीवर काँग्रेसने बहिष्कार घातला व घरोघरी खानेसुमारीविरुद्ध प्रचार करताना तसेच घराघरांवर लिहिलेले नंबर डांबराने पुसून टाकताना वसंतराव पकडले गेले व पुन्हा महिनाभर तुरुंगवास घडला.

**भूमिगत राहून कार्य**

१९४२ मध्ये 'छोडो भारत' चळवळीत वसंतरावांनी सक्रिय सहभाग घेतला.



पोस्ट कार्यालये बंद पाडली. टपालपेट्या फोडून पत्रे जाळली. मामलेदार कचेरी, म्युनिसिपालिटीवरील युनियन जॅक काढून तिरंगा फडकविला. भूमिगत राहून वसंतराव ही चळवळ सहकाऱ्यांसमवेत करीत होते. डॉ. हर्डीकर, रंगाराव दिवाकर, रामराव हुक्केरीकर, गंगाधरराव देशपांडे या नेत्यांना विनाचौकशी तुरुंगात ठेवण्यात आले. म. गांधींच्या संदेशाची बुलेटिन्स 'सायक्लोस्टाइल' करून शहरभर भिंतीवर चिकटविण्याचे काम वसंतराव व त्यांचे सहकारी करीत असताना ते पकडले गेले. विनाचौकशी सात-आठ महिने हिंडलगा कारागृहात त्यांना डांबण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळातही वसंतरावांनी समाजसेवा सुरू ठेवली. कऱ्हाडे ब्राह्मण संघाची स्थापना, नंतर त्याचे केलेले पुनरुज्जीवन, व्यापारी कामगार संघाची स्थापना, ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना, सत्संग मंडळाची स्थापना, पत्राद्वारे, दासबोध अभ्यासाची सुरुवात केलेली बेळगाव शाखा, योगशिक्षणाचे वर्ग आदी उपक्रम वसंतरावांनी सुरू केले आणि सातत्याने ते चालू ठेवले.

गेल्या वर्षी वसंतरावांना सत्कारासाठी आमंत्रित करण्यात आले होते. मात्र कागदपत्रांची जुळवाजुळव न झाल्याने आणि स्वातंत्र्यलढ्याशी संबंधित फोटो मिळाले नसल्याने जाता आले नाही, असे त्यांचे चिरंजीव सुहास गुर्जर यांनी सांगितले. वसंतरावांच्या शतायुषी आयुष्याची विचारणा केली असता वसंतरावांनी निर्व्यसनी, ध्यानधारणा, योगाभ्यास असे उत्तर दिले. साधेपणाने राहणे आणि दुसऱ्याकरिता काहीतरी करावे, स्वतःचा स्वार्थ न बघता दुःखी लोकांना सुखी करावे, असा संदेश त्यांनी दिला.

वसंतरावांचे शरीर थकले तरी मन थकलेले नाही, आजही जुन्या आठवणी त्यांच्या स्मरणात आहेत. तर दृष्टी चांगली आहे. चेंबर ऑफ कॉमर्सचे ते सदस्य असताना तत्कालीन उपराष्ट्रपती राधाकृष्णन आले होते, याची त्यांनी प्रकर्षाने आठवण करून दिली.

## वयाच्या ५७ व्या वर्षी दहावी उत्तीर्ण

**वसंतरावांना शिक्षणाची आवड होती; परंतु परिस्थितीमुळे त्यांना शक्य झाले नाही. मात्र त्यांनी हार मानली नाही. १९७३ मध्ये वयाच्या ५७ व्या वर्षी सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांनी दहावीची परीक्षा दिली व ते उत्तीर्ण झाले.**

## पंडित सुरेश तळवलकर यांना 'तालविश्व'चा पुरस्कार प्राप्त

'तालविश्व'चा तालविश्व उस्ताद मेहबूब खानसाहेब मिरजकर पुरस्कार पंडित सुरेश तळवलकर यांना पालकमंत्री गिरीश बापट यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

तबलावादक मेहबूब खानसाहेब मिरजकर यांच्या ५० व्या आणि तबलावादक



महंमद हनीफ खानसाहेब मिरजकर यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त 'गुरू-शिष्य आणि संगीताचा वारसा जपणाऱ्या दोन पिढ्या' ही संकल्पना घेऊन 'संगीत विरासत' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात ज्येष्ठ तबलावादक रशीद मुस्तफा थिरकवा आणि त्यांचे सुपुत्र शरीफ मुस्तफा यांच्यात तबलावादनाची, तर सरोदवादक राजन कुलकर्णी आणि त्यांचे सुपुत्र सारंग कुलकर्णी यांच्यात सरोदवादनाची जुगलबंदी रसिकांनी अनुभवली. त्यानंतर सुरेश तळवलकर आणि त्यांच्या कन्या सावनी तळवलकर यांचे तबलावादन झाले.

# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचा १० एप्रिल रोजी रौप्य महोत्सवी कार्यक्रम

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण संस्था, 'संपर्क'चे सभासदांस कळविण्यास आनंद होत आहे की, आपल्या महासंघास २५ वर्षे आणि 'संपर्क'ला ११ वर्षे पूर्ण होणार असल्याने पुण्यामध्ये महासंघाचा रौप्य महोत्सवी कार्यक्रम 'संकल्प' मंगल कार्यालय, बँक ऑफ महाराष्ट्र, नवी पेठ शाखेसमोर, शास्त्री रोड, पुणे ४११०३० येथे रविवार, दि. १० एप्रिल २०१६ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. या कार्यक्रमात आपल्या ज्ञातीमधील विविध क्षेत्रांत कार्य केलेल्या व्यक्तींचा सत्कार, करमणुकीचा कार्यक्रम, चहा, नाश्ता, जेवण आणि स्मरणिकेचे प्रकाशन असा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विविध समित्या बनवण्यात आल्या असून, प्रत्येक शहरातील त्या त्या संघांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे त्या त्या संघातील सभासदांना कार्यक्रमाची माहिती, कार्यक्रमासाठीचे निमंत्रण व पासेस देण्याची योजना केली आहे.

स्मरणिकेसाठी आपण समग्र कऱ्हाडे ज्ञातीची माहिती जसे की आडनावे, गोत्र, कुलदैवते, कुलदेव तसेच कऱ्हाडे ज्ञातीतील विविध क्षेत्रात आपले नाव उच्चपदावर नेऊन ठेवले, अशा व्यक्तींची नावे व फोटो, कऱ्हाडे ज्ञातीबद्दल माहिती, कऱ्हाडे व्यक्तींची विशेष अशा कथा, प्रत्येक कऱ्हाडे संघाबाबत माहिती, असे त्याचे स्वरूप असेल. या स्मरणिकेमध्ये जाहिराती मिळवाव्या लागतील. त्यासाठी प्रत्येक संघाने ३ जाहिराती तरी मिळवाव्या, असे ठरविले आहे. जाहिरातीचे दरपत्रक वेगळे पाठवणार असून, या आवाहनामध्ये ते कळवत आहोत.

प्रत्येकाच्या माहितीसाठी आपण नियुक्त केलेल्या समित्या, त्यामधील सभासद व त्यांचे मोबाईल क्रमांक असलेली यादी देत आहोत. तरी सर्वांनी याची नोंद घ्यावी आणि आपला हा रौप्य महोत्सवी कार्यक्रम यशस्वी करण्यास हातभार लावावा.

विविध समित्या आणि त्यांचे सभासद व मोबाईल क्रमांक पुढीलप्रमाणे :-

**१. निधी संकलन समिती**

श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगाव
मो.: ०९४४९०५१६५३
श्री. संदीप पुराणिक, डोंबिवली
मो.: ९८५००९४३००
श्री. जयंत लघाटे, मुलुंड
मो.: ०९९६९०३७३४१
श्री. आनंद खंडकर, कोल्हापूर
मो.: ९८५००८८७४
श्री. सुहास खानवलकर, पुणे
मो.: ९४०३९२८५२०
श्री. प्रसाद पंडित, गिरगाव
मो.: ९८६९१५५२१५
श्री. सुनील जठार, रत्नागिरी
मो.: ९०२८५९३८३९
सौ. बोरवणकर, नागपूर

**२. बजेट कमिटी**

श्री. संजय अंबर्डेकर, ठाणे
मो.: ९८२०४१७९८१
श्री. अनिल सरदेसाई, डोंबिवली
मो.: ९२२०२१०४०२
सौ. मृणाल नानिवडेकर, नाशिक
मो.: ९२७०५६४२८०
श्री. गोपाळ भाटवडेकर,
मो.: ९८५०९७९७०६
श्री. गणेश गुर्जर, पुणे
मो.: ९८९०९९०११३/८१४९९०७७८९
श्री. विनायक शेणोलीकर, ठाणे
मो.: ८८७९८१५५७९
श्री. केतन अमृते, नाशिक
मो.: ९९२२४४४९०३

**३. स्वागत आणि सत्कार समिती**

श्री. गोपाळ भाटवडेकर, पुणे
मो.: ९८५०९७९७०६
श्रीमती माधुरी शेंबेकर, मुलुंड
मो.: ०९८६९०४९८५२
श्री. धर्मराज पंडित, कोल्हापूर
मो.: ९८६०३५१०५०
श्री. रामदेव, गिरगाव
मो.: ९८६९५६७८५०
श्री. केदार पाध्ये, डोंबिवली
मो.: ९७६९१२१०७७
श्री. माईणकर, नागपूर
मो.: ९४२३६७९१४२
श्री. सुनील खेर, नाशिक
मो.: ९४२२२४९८५१
श्री. अजित सरवटे, ठाणे
मो.: ९९८७२०५६९०
श्री. सुरेश जठार, नाशिक
मो.: ९०९६३५०३५७

**४. स्मरणिका समिती**

श्री. गणेश गुर्जर, पुणे
मो.: ९८९०९९०११३/८१४९९०७७८९
श्री. अनिल सरदेसाई, डोंबिवली
मो.: ९२२०२१०४०२
श्री. श्रीगजानन गुर्जर, पुणे
मो.: ९९७०१७४८१८
श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर
मो.: ९२२५८००५८७
श्री. दिलीप धोपेश्वरकर, गिरगाव
मो.: ९८२०५२१०९८
श्री. हेमंत पुराणिक, पुणे
मो.: ९९२३८१०१९४/९४२११०४२७२
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर
मो.: ०७१२२५२५७०४
श्री. श्रीधर पंतवैद्य, पुणे जाहिरात संकलन
मो.: ७७०९००८३६९
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक
मो.: ९४०३१४८७७५

**५. सांस्कृतिक समिती**

डॉ. सौ. राजश्री महाजनी, पुणे
मो.: ९४०४२२७२१०
श्रीमती शुभा मोघे, पुणे
मो.: ८८०५००१६३३
श्री. शेखर मावळंकर, गिरगाव
मो.: ९९८७८२८४३९
सौ. अदिती तांबे, गिरगाव
मो.: ९९६९३५७३८०
सौ. लघाटे, नागपूर मो.:
श्री. रवींद्र पुसाळकर, मुलुंड
मो.: ९०४९९९२८००
श्री. प्रसाद करकरे, मुलुंड
मो.: ९८६७६१९१५३

**६. अन्नपूर्णा समिती**

श्री. गोपाळ भाटवडेकर, पुणे
मो.: ९८५०९७९७०६
श्री. मकरंद फणसळकर, पुणे
मो.: ९८२२६१७३२४

श्री. लक्ष्मीकांत देसाई, पुणे
मो.: ८८०६१८८६७१
श्री. नरेंद्र ताटके, नाशिक
मो.: ९८६०५५७३२०

**७. स्वयंसेवक समिती**


श्री. गणेश गुर्जर, पुणे
मो.: ९८९०९९०११३/८१४९९०७७८९
श्री. दीपक भडकमकर, पुणे मो.: ८६०५११२९६०
श्री. श्रीगजानन गुर्जर, पुणे मो.: ९९७०१७४८१८
श्री. नंदकुमार सप्रे, पुणे मो.: ९८८१२०८८४८
श्री. श्रीकांत गुर्जर, पुणे मो.: ९८२२०१५१३३

**जाहिरातींचे दर**

| | |
|---|---|
| **१. रंगीत पाने** | |
| मुखपृष्ठ पान क्र. २ व ३ | रु.१२०००/- प्रत्येकी |
| मलपृष्ठ पान क्र. ४ | रु.१५०००/- |
| आतील पाने | रु.१०००० प्रत्येकी |
| बुकमार्क | रु.५०००/- दोन्ही बाजू,<br>रु. २५००/- एका बाजूस |
| **२. कृष्णधवल पाने** | |
| पूर्ण पान | रु.६०००/- प्रत्येकी |
| अर्धपान | रु.३०००/- प्रत्येकी |
| ३. शुभेच्छा नावे | रु. ५००/- पासून १००० पर्यंत |
| ४. तळपट्टी | रु.५००/- |

## सर्वोच्च आनंदाचा क्षण!

ज्येष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या 'ययाती' कादंबरीला 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला तेव्हाचा हा प्रसंग. भाऊसाहेबांचे अभिनंदन करण्यासाठी असंख्य चाहते हार, पुष्पगुच्छ घेऊन त्यांच्या घरात जमलेले. छायाचित्रकार, पत्रकारही उपस्थित होते. खांडेकरांची मुलाखत, छायाचित्रासाठी त्यांची लगबग चाललेली. इतक्यात एकाने भाऊसाहेबांना विचारले, ''तुम्हाला इतका मानाचा पुरस्कार मिळतो आहे. आपल्या जीवनातील हा आनंदाचा सर्वोच्च क्षण असेल ना?'' प्रश्न ऐकताच खांडेकरांनी क्षणभर डोळे मिटले. खोलीत शांतता पसरली. गर्दीतील सर्वांनीच उत्तर ऐकण्यासाठी कान टवकारले. इतक्यात डोळे उघडून खांडेकर म्हणाले, ''हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर, आज सकाळी



एका अपरिचित व्यक्तीने भेटून माझ्या गळ्यात हार घातला. नमस्कार करून आशीर्वादही मागितले. मी ओळखले नाही! माझ्या चेहऱ्यावरील भाव समजून जाऊन तो स्वतःहूनच म्हणाला, ''आज मी जो आहे तो आपणामुळेच. काही वर्षांपूर्वी एका तळ्याच्या शेजारून जाताना अचानकपणे तोल जाऊन मी पाण्यात पडलो. मला पोहता येत नसल्याने गटांगळ्या खाऊ लागलो. माझी ती अवस्था त्या वेळी तिथूनच जाणाऱ्या आपण पाहिलीत आणि अंगावरील नेसत्या कपड्यांनिशी लगेचच पाण्यात उडी मारून माझा जीव वाचवलात. मी ठीक आहे हे पाहून आपण उपकाराची भावना प्रकट न करता ओल्या अंगाने तसेच निघून गेलात. अनेक दिवसांनंतर आपला जीव वाचविणारी व्यक्ती म्हणजे ख्यातनाम लेखक वि. स. खांडेकर आहेत, हे मला समजले. तेव्हापासून आपणास भेटायचे होते. तो योग आज जुळून आला.''
खांडेकर म्हणाले, ''कोणाला तरी जगायला मदत करू शकलो, ही गोष्टच माझ्या दृष्टीने महत्त्वाची! आणि तोच माझ्या आयुष्यातील आनंदाचा सर्वोच्च क्षण आहे.''

## संस्थावृत्त

### कऱ्हाडे ब्रह्मण संघ मुलुंड मुंबई संघाचा 'कोजागिरी कार्यक्रम'

कऱ्हाडे ब्रह्मण संघ मुलुंड मुंबई आयोजित कोजागिरी कार्यक्रमानिमित्त श्री. राजाभाऊ शेंबेकर (चिपळूण) यांच्या गायनाचा कार्यक्रम मुलुंड पूर्व येथील विरंगुळा सभागृहात दि. १/११/२०१५ शनिवार रोजी सायं. ६ ते ८ या वेळात झाला.
श्री. प्रकाश आंबर्डेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माधुरी शेंबेकर यांच्या प्रास्ताविकानंतर नवीन सभासदांचा परिचय करून दिला व सर्वांचे स्वागत केले.
या वेळी मुलुंडमधील प्रसिद्ध गायिका नीलिमा पुराणिक (देवस्थळी) या माहेरवाशीण म्हणून आपल्या सभासद झाल्या. त्यांनी कलाकारांचा यथोचित परिचय करून दिला. श्री. राजाभाऊ शेंबेकर हे स्वतः प्रथम तबलावादक, हार्मोनियम वादक आणि गायक असे कलाकार आहेत. राग मधुवंतीने सुरुवात करून विस्मृतीत जात असलेली नाट्यगीते त्यांनी सादर केली.
होसी कैसा भ्रांत चित्त तू - सहस्रनयना - उघडी नयना, झाले युवतीमना - तसेच 'धाडिले राम तिने का वनी'मधील जनलोका - विरमय हा - ब्रह्म मूर्तिमंत- हे सुरांनो चंद्र व्हा- सुखाचे हे सुख- श्रीहरीचे मुख हा अभंग - दिवे लागले रे तमाच्या ही गजल अशी गीते सादर करून रसिकांची वाहवा मिळविली. तबल्यावर साथ श्री. प्रसाद करंबेळकर (पुणे) आणि हार्मोनियमवर श्री. केदार भागवत (गिरगाव) यांनी केली. विवेक शहाणे यांनी सर्वांचे यथोचित आभार मानले. अल्पोपाहार आणि मसला दुधाचा आस्वाद घेऊन या गीत मैफिलीची सांगता झाली.

**- माधुरी शेंबेकर**
मोबा : ९८६८०४९८५२

# जेव्हा कार्यशाळेची आनंदशाळा होते...

संगीत शिकणारे व शिकून पुढं गेलेले, उत्सुक तरुण-तरुणी गर्दी करून बसलेले... भारतीय शास्त्रीय संगीतातील निरनिराळ्या घराण्यांची वैशिष्ट्यं जणू गोष्टीरूपानं ऐकण्यात तल्लीन... निरनिराळ्या रागांबद्दलचं विवेचनही खुलत चाललेलं... वक्ता निरनिराळ्या बंदिशी गाऊन दाखवत शास्त्र उलगडतोय अन् ऐकणाऱ्यांना किती ऐकू, असे झालेलं... त्या कार्यशाळेची चक्क आनंदशाळाच झाली.

पौड रस्त्याजवळील भारती विद्यापीठाच्या स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सतर्फे झालेल्या या कार्यशाळेचा विषय होता उत्तर भारतीय शास्त्रीय संगीतातील घराणी व रागतत्त्व. ग्वाल्हेर घराण्यातील ज्येष्ठ गायक व संगीत अभ्यासक पंडित विकास कशाळकर यांनी निरनिराळ्या सांगीतिक घराण्यांचे विविध पैलू उलगडून दाखवले. पूर्वी ध्रुपद स्वरूपात



निबद्ध असलेल्या शास्त्रीय संगीताची वाटचाल ख्यालगायनाकडे कशी झाली व ख्याल गाणारी घराणी कशी निर्माण झाली ते त्यांनी अत्यंत रंजकपणे कथन केले.

घराण्यानुसार, रागस्वरूप व बंदिशींचा चेहरामोहरा कसा बदलतो, त्या-त्या प्रकारच्या गायकीसाठी विशिष्ट ठेकाच कसा असतो, हे कशाळकरांनी विस्तारपूर्वक सांगितले. घराण्यानुसार आलापी, तानांचे (सपाटतान, बोलतान आदी) कुठले प्रकार जास्त घेतले जातात, आवाजाचा लगाव, रागांची निवड यातले वैविध्य त्यांनी अनेक बंदिशी गाऊन सोदाहरण स्पष्ट केले. ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर या घराण्यांबद्दल श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांना खुलवून उत्तरे दिल्यामुळे या कार्यशाळेचा अनुभव अत्यंत समृद्ध करणारा ठरला. जाणकारांप्रमाणेच सामान्य रसिकही ही माहिती साठवत होते.

बिगा, शंकरा, भैरव, बागेश्री, जोग, तिलंग, ललत, तोडी व दरबारी यासारख्या रागांच्या माध्यमातून कशाळकरांनी रागस्वरूप, चलन, भावपक्ष, कलापक्ष, कौशल्यपक्ष व प्रयोगशीलतेचे मर्म सांगितले. सौंदर्य वाढविण्यासाठी शास्त्रसंमत नियम वाकवणाऱ्या थोर कलावंतांची उदाहरणे त्यांनी दिली. मात्र अभिव्यक्तिस्वातंत्र्य घेणाऱ्याचा आधी पाया किती मजबूत असायला हवा, तेही पटवून दिले. विभागप्रमुख शारंगधर साठे यांनी नव्या पिढीला प्रगतीसाठी शास्त्राचा सखोल अभ्यास अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. या कार्यशाळेसाठी कशाळकरांना स्वानंद कुलकर्णी (हार्मोनियम), सागर पटोकार व प्रवीण कासलीकर (तबला) यांनी साथ केली.

## अभिनंदन व शुभेच्छा!

यंदा आपल्या कऱ्हाडे ब्राह्मण महासंघास २५ वर्षे व 'संपर्क' मासिकास ११ वर्षे पूर्ण होत आहेत. आपल्या सर्वांचे अनमोल सहकार्य व भक्कम पाठींब्यामुळेच हे शक्य झाले आहे. या बद्दल सर्व संस्थांचे सभासद, पदाधिकारी, जाहिरातदार, वाचक आपणा सर्वांचे हार्दिक अभिनंदन!!! नववर्षा निमित्त महासंघास व संपर्क मासिकास पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!

**- संपादक**

## With Best Compliments from

# PRAKASH HOME INDUSTRIES

PHI SINCE 1960

**An ISO 9001 : 2008 Certified Company**

PHI the manufacturers of small machine tools, started its activity in small workshop in the year 1960 in Belgaum City. Initially it started producing Hand Operated Punching Machines, Hand Presses and Sheet metal components. In the year 1976 it shifted its factory in modern building in Udyambag, Belgaum for better production. Now PHI is manufacturing small machine tools-Radial and Pill Drilling Machines, Centre Lathes, Vertical Spindle Surface Grinders, Tool and Cutter Grinder, Filing Machine. All machines are designed and manufactured indigeneously. Machine tools are produced with good quality of Raw Materials, rigorous quality control and skilled workmanship. PHI is known for producing Finest Quality of machine tools in small sector, for Reliability and prompt after sales service.

**Address**

R. S. No. 695-C, Near Rani Channamma Nagar, IInd Stage, Udyambag, BELGAUM - 590 008. (INDIA) Phone: +91 - 831 - 2441626,2442390 Fax: +91 o 831 - 2445026 Mobile: 09448395664 E-mail: phibgm@gmail.com

**Manufacturers of :** Machine Tools, Radial Drilling Machines, Surface Grinders, Filing Machines, Tool & Cutter Grinders etc.

**Sheet Metal Parts :** Air Cleaner Housing, Pre cleaners, Silencers, Tanks, Hoods, Pipe Bends etc.




DRILLING MACHINE
Model - PRD - 7 / PRD -10




**MANUFACTURE OF MILD STEEL SHEET METAL PRESSED COMPONENTS & ASSEMBLIES LIKE...**

- Exhaust Manifolds
- Various size elbows, bend pipes for Air, Water, oil circulation
- Housings for Air Cleaner Filters.
- Exhaust Connections
- Fuel Tanks
- Brackets, clamping rings, covers etc.
- Exhaust Silencers.




(VERTICAL SPINDLE SW VELLING HEAD ROTARY TABLE)
SURFACE GRINDER
Model - ACCUGRIND 300 /400 /450










**Machining of :** Heavy Cast Iron & Steel Components on Turning Center VMC, HMC & Conventional Set up

**MACHINERY AT PHI**

- HMC (Okuma) 1000mm X1000mm X 950mm (Twin Pallet) Spindle HSK 100
- HMC (Mitsui Seiki) 800mm X 800mm X 750mm (Twin Pallet)
- VMC (Haas) 1016mm X 660mm X 635mm
- Turning Centre (Haas) Turning dia 530 swing 800
- Balancing Machine (300 dia max weight 50kg) Conventional setup (Lathe, drilling, milling, VTL machine, horizontal grinding, cylindrical grinding etc.)

**MEASURING INSTRUMENTS/ TESTING EQUIPMENTS**

- Trimos-1 meter accuracy 1 micron
- Surface Roughness Tester
- Granite Surface Plate (size 1800mm x 1200mm x 200 mm)
- External facility for CMM (3000mm X 1500mm) at B.F.C
- Other measuring instruments like micro meter, vernier caliper, vernier height guage, bore dial guage etc.

# खाद्यविविधता

## सात्त्विक नाचणी पिझ्झा



**साहित्य :** नाचणीचे पीठ, मूग, मसूर, मटकी ही कडधान्ये, मोड आलेला हिरवा वाटाणा. बीट, सिमला मिर्ची, कांदा, टोमॅटो, चीज, लोणी, टोमॅटो केचप.

कृती : प्रथम नाचणीच्या पिठाची भाकरी करावी. मोड आलेली कडधान्ये, हिरवा वाटाणा, चवीनुसार मीठ टाकून वाफवून घ्यावा. नंतर नाचणीच्या भाकरीवर लोणी पसरावे. त्यावर टोमॅटो केचप पसरावा. त्यानंतर वाफवलेली कडधान्ये टाकावी व त्यावर बारीक चिरलेला कांदा, सिमला मिर्ची, बिटाचा कीस, टोमॅटो स्लाइस ठेवून वर चीज किसून घाला. नॉनस्टिक पॅनमध्ये मंद आचेवर झाकण ठेवून शेका.

असा झालेला नाचणी पिझ्झा प्लेटमध्ये ठेवून सर्व्ह करावा.



## व्हेज फ्रँकी

साहित्य : २ वाट्या मैदा, अर्धे पाकीट अमूल बटर, कोणतीही सुकी भाजी किंवा सुकी उसळ, कांदा चिरलेला, टोमॅटो, गरम मसाला, मीठ, तिखट असं तेलावरून भाजून घेतलेली भाजी त्यात वरील साहित्य घ्यावे.

कृती : मैदा, मीठ व तेल घालून सैलसर भिजवा त्याचे फुलक्या एवढे गोळे करून ते लाटून घ्यावेत. फ्रँकी करताना पोळी गरम करून घ्यावी फुलका पसरावा, व एक इंच अंतर सोडून २/३ चमचे भाजी पसरावी. दोन्ही बाजूस आत दुमडून घ्याव्यात व घट्ट गुंडाळी करून घ्यावी. गुंडाळी बंद करताना मैद्याची पेस्ट लावावी.

मोठ्या तव्यावर ३-४ फ्रँकी ठेवून सगळीकडून अमूल बटर लावून खरपूस भाजून घ्यावे. वरून कांदा- चिंचेची चटणी, चिरलेली कोथिंबीर घालून सर्व्ह करावी.


WITH BEST COMPLIMENTS FROM

**मे. डी.व्ही. भाटवडेकर क्लॉथ मर्चंटस्**

फोन नं. - २४४५६०४७

६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,

नू. म. वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११ ०३०,

**कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लाँग क्लॉथ, पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीटस्, टॉवेल्स, रेडीमेड पायजमे बंडी - कुडते - बर्म्युडा - ३/४ पँटस्**

अधिकृत विक्रेते

युनायटेड होजिअरी - कॅप्टन होजिअरी

**निकेत फोटोज्**

कर्वेनगर शाखा

सौ. नेहा सप्रे - ९८५०८८४९४५

| | |
|---|---|
| पोर्ट फोलिओ | स्कॅनिंग |
| स्टुडिओ फोटोज् | व्ही.एच.एस. / डीव्ही कॅसेटची सीडी |
| पासपोर्ट फोटोज् | कॅमेरा रिपेअरिंग |
| रोल्स डेव्हलपिंग/प्रिंटींग | टेबल टॉप्स |
| लॅमिनेशन | इंडस्ट्रिअल फोटोग्राफी / व्हिडीओ शूटींग |
| डिजीटल मिक्सिंग फोटोज् | सर्व प्रकारच्या लहान मोठ्या कार्यक्रमांचे |
| कोलाज् | फोटो आणि व्हिडीओ शूटींग |

* अपंग किंवा दुर्धर आजारी लोकांसाठी घरी येऊन फोटो काढण्याची सुविधा



आपला मुलगा/मुलगी
देशाबाहेर आहे का ?
**इंटरनेट** वरून
त्यांना संपर्क करताना
त्रास होतो ?

आम्हाला कॉल करा
आम्ही आपला त्रास
स्वस्त दरात कमी करू.



**SDS ENTERPRISES**

**Sales**
- Desktop
  a. Branded
  b. Assembled
- Laptops
- Tables
- Printers
- Accessories

**Repairs**
- Desktop
- Laptop
- Accessories

**Solutions**
- On Internet
- Network
- Web
- Annual Maintenance
  a. Desktop
  b. Laptops
  c. Network
  d. Printers

संपर्क
**Shantanu Gurjar**
**9890990112**
**9326209282**
shantanu@sdsenterprises.net

# इन्शुरन्स स्पेशालिस्ट

सुरक्षित करा आपले भवितव्य



सर्व प्रकारच्या विमा योजना
एकाच ठिकाणी उपलब्ध.

१) जीवन विमा
२) आरोग्य विमा (मेडिक्लेम)
३) वाहन विमा
४) अपघात विमा
५) प्रवासी विमा
६) मालमत्ता (प्रॉपर्टी) विमा
७) संस्थेचा विमा
८) सागरी (मरिन) विमा
९) सामुदायिक विमा (ग्रुप इंन्शुरन्स)
१०) अनिवासी भारतीय विमा



मंगेश जांभेकर
मोबाईल : ९८१९७ ५०९५५
Email : mangesh.jambhekar@gmail.com
Office Add.: Cabin No. 2, Prime Space Business Centre, So Lucky HSG. Society
M. G. Road, Above Sunder Hotel, Vile Parle East, Mumbai 400057



माऊली हॉल
मिनी माऊली हॉल
सर्वेश हॉल
मंगलमूर्ती समाग्रह
ब्राम्हणसभा (पंडितवाडी) कल्याण.

संपूर्ण व्यवस्थापन

# सुयश कॅटरर्स

१९७२ पासूनची स्वादिष्ट परंपरा

आपुलकीने सेवा देणारी माणसं



सुहास व स्वाती पंडित
यांचे भ्रमणध्वनी
९८३३३०४०३३
९८३३०४२७३३

अन्य संपर्क
सौ. गौरी सरपोतदार-९९३०८८६०४८
योगेश कानेटकर-९८१९०३९३५९

सिटी मॉल, पेंढारकर कॉलेज जवळ, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व)

।।श्री।।

स्थापना : गणेश चतुर्थी १९९३

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा

प्रकाश जठार यांचे

# ज्योती एन्टरप्रायझेस

(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व
सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)

पत्ता – गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर,
गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन – ४२१२०१,
फोन–०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी – ९८१९२५१४१२

ऋणानुबंध घराण्यांचे, संस्कार पिढ्यान् पिढ्यांचे

(व्यवस्थापन)

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**

(समर्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या मालकीचे)

## श्रुति मंगल कार्यालय

आमचे मार्गदर्शक व आमचे सद्गुरू

।।श्री दिगंबरदास महाराज।।

यांच्या आशिर्वादाने श्रुति मंगल कार्यालयानं मंगल कार्याची परंपरा निर्माण केली व जपली आहे. विवाह, मौंजीबंधन अथवा कोणताही समारंभ या सर्वांतून दृग्गोचर होते घराणे व सुसंस्कृतपणा हा समारंभ संपन्न करणाऱ्या परिवारांचा. अशा साजऱ्या होणाऱ्या समारंभासाठी सुयोग्य वास्तू उपलब्ध करून देणे जिला असेल पावित्र्य मंदिराचे, जेवण असेल अन्नपूर्णेचे, सौंदर्य असेल वास्तूरचनेचे, सुख असेल आधुनिकतेचे हेच श्रुति मंगल कार्यालयाचे 'ध्येय'. बाकी कार्य सिद्धीस नेण्यास श्री समर्थ आहेतच.

**मंगल कार्यासाठी दोन स्वतंत्र हॉल**

**दुर्गा हॉल** : पहिला मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या

**जानकी हॉल** : दुसरा मजला – ३६०० चौ. फुट
वधू–वर पक्षासाठी प्रत्येकी २ खोल्या (टेरेस १००० चौ. फुट)
सर्व खोल्या सेल्फ कन्टेन्ड, प्रशस्त पार्किंग, हवेशीर, भरपूर उजेड, मध्यवर्ती, उत्कृष्ट भोजन, उत्तम वाढप व्यवस्था, लिफ्टची सुविधा, शिवाय दोन मोठे जिने हे सर्व अत्यंत वाजवी दरात

**श्री अन्नपूर्णा केटरर्स**
श्री. प्रभाकर र. काजरेकर
**श्रुति मंगल कार्यालय**

१२३६, आपटे रस्ता, डेक्कन जिमखाना, पुणे – ४११ ००४
दूरध्वनी : ०२०–२५५३१७४९, २५५२१४४० फॅक्स : ०२०–२५५२१९९८
Website : www.shrutimangal.com E-mail : hrishikesh@shrutimangal.com

## WITH BEST COMPLIMENT FROM:

### J.P.F METACAST PVT LTD

PLOT NO. 7, 16, 29 MACCHE INDUSTRIAL ESTATE
BELGAUM - 590014 KARNATAKA, INDIA
Ph: 0831-2440664 Fax : 0831-2441069
E-mail : admin@jpfmetacast.com
www.jpfmetacast.com

***Manufacturers of all types of Cast iron and Ductile Iron castings***

- An ISO 9001 : 2008 certified company
- Winner of National Quality Award in SSI - 1998
- Winner of Rajeev Gandhi National Quality Award - 2007
- Winner of Jayaswal Neco Best Quality award from Institute of Indian Foundrymen - 2012
- Winner for Best Operations Management from S.P.Jain Institute of Management and Research, Mumbai 2014

**Industries Served :** Diesel Engines, Tractors, Compressors, Road construction Machineries, Machine Tools ,etc

